




# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १३९ * नांदेड * मंगळवार, दि. २६ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## पेट्रोल-डिझेलमध्ये दरवाढ सुरूच

# पेट्रोल २.६१ तर डिझेल २.१७ रूपयांनी महागले

**मुंबई (प्रतिनिधी)–** इराण-अमेरिका संघर्षामुळे जागतिक स्तरावर उर्जेचं मोठं संकट निर्माण झालं असून त्याची झळ आता भारतातही तीव्रपणे जाणवू लागली आहे. गेल्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सलग चार वेळा वाढ करण्यात आली असून देशात इंधन टंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. या वाढत्या संकटामुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी वर्गालाही मोठा फटका बसत आहे.

सर्वत्र महागाईचा भडका उडाला असताना त्यात पुन्हा काहीशी भर घालणारी बातमी समोर आली आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा एकदा दरवाढ झाली आहे. गेल्या दहा दिवसांत इंधनाच्या दरात दरवाढ होण्याची ही चौथी वेळ आहे. पेट्रोलच्या दरात २.६१ रुपयांनी आणि डिझेलच्या दरात २.१७ रुपयांनी वाढ झाली आहे. दिल्लीत डिझेलचा दर ९५.२० रुपये प्रति लिटर आणि पेट्रोलचा दर १०२.१२ रुपये प्रति लिटर झाला आहे. तर मुंबईत पेट्रोल २.७६ रूपये वाढले असून मुंबईत पेट्रोल १११.२१ रूपये प्रति लीटर, तर डिझेल २.८१ रूपयांनी वाढून ९७.८३ रूपये प्रति लीटर इतके झाले आहे.

सर्वात महत्वाची बाब म्हणजे, गेल्या १० दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात झालेली ही चौथी दरवाढ आहे. पहिली दरवाढ १५ मे रोजी सुमारे ३ रूपंयानी झाली. त्यानंतर १९ मे रोजी सुमारे ९० पैशांनी, पुन्हा २३ मे रोजी सुमारे ९० पैशांनी आणि आता, २५ मे रोजी पुन्हा एकदा लक्षणीय वाढ झाली आहे. एकूणच, गेल्या १० दिवसांत पेट्रोल प्रति लिटर ७.३५ रूपयांनी आणि डिझेल प्रति लिटर ७.५३ रूपयांनी महाग झाले आहे.

### नांदेड जिल्ह्यात कॅनमध्ये डिझेल देण्यास आजपासून बंदी

नांदेड जिल्ह्यात डिझेलची मागणी अचानक ३० ते ३५ टक्क्यांनी वाढल्याने टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पेट्रोल पंपांवर मोठी गर्दी पाहायला मिळत असून काही ठिकाणी तणावपूर्ण वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून पंपांवर गरजेनुसार पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून, डिझेल विक्रीवर नियंत्रण ठेवण्यात आले आहे. तसेच सर्व पेट्रोल पंपांवर कॅनमध्ये डिझेल देण्यावर बंदी घालण्यात आली आहे. सोशल मीडियावर डिझेल टंचाईबाबत अफवा पसरवणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले जाणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. साठेबाजी करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाणार असल्याचे पुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

## आंबेनळी घाटात स्कॉर्पिओ कोसळली, ८ जणांचा मृत्यू

**रायगड (प्रतिनिधी)–** रायगड जिल्ह्यातील आंबेनळी घाटातील भीषण अपघाताने संपूर्ण महाराष्ट्र हादरला. साताऱ्यातील आसगाव येथील तरूणांच्या स्कॉर्पिओ गाडीचा पोलादपुर आणि महाबळेश्वर दरम्यान असलेल्या आंबेनळी घाटात भीषण अपघात झाला. सदर स्कॉर्पिओ सुमारे १००० ते १५०० फुट खोल दरीत कोसळली या अपघातामध्ये एकूण ८ जणांचा जागीच मृत्यू झाला.

सदर अपघाताबाबतची थरारक कारणे समोर आली आहे. रायगड आणि सातारा जिल्ह्यांना जोडणारा आणि महत्त्वाचा मार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंबेनळी घाटातील अपघाताची मालिका सुरूच आहे. आज पहाटे झालेल्या स्कॉर्पिओ अपघात स्थळावर भरधाव वेगात आणि नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात घडला. मात्र ज्या ठिकाणी हा अपघात घडला त्या ठिकाणी संरक्षित कठडे नसून केवळ मातीचा ढीग प्रवाशांच्या सुरक्षेसाठी असल्याने स्कॉर्पिओ गाडी मातीवर चढून खाली कोसळली आणि या अपघातात रितेश राजेंद्र लोखंडे (वय २५), महेश अनिल पवार (वय २५), आदित्य अशोक साळुंखे (वय २१), सुहास जितेंद्र लोखंडे (वय २०), अंश समीर चव्हाण (वय १८), उत्कर्ष आनंद शिंगटे (वय २१), अनिल अभिमन्यू शिंगटे (वय २५), नितीन किसन नायकोंडे (वय ३५) या ८ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.

## देशातील पहिला ‘पाण्याचा सातबारा’ महाराष्ट्रात

**मुंबई (प्रतिनिधी)–** पाण्याचा बेसुमार वापर टाळण्यासह जल व्यवस्थापन करण्यासाठी आता जमिनीच्या सातबाराच्या धर्तीवर ‘पाण्याचा सातबारा’ देशात प्रथम महाराष्ट्रात विकसित करण्याचे नियोजन सुरु करण्यात आले आहे. विकसित महाराष्ट्राच्या दिशेने पाऊल टाकण्यासाठी ही योजना प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात येणार आहे. यासाठी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास विभागाची तयारी सुरु केली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास विभागाच्या सचिवांसोबत सोमवारी मंत्रालयातील बैठकीत यावर सविस्तर चर्चा केली.

जलव्यवस्थापन करणाऱ्या अक्रेरियम या संस्थेने यासाठी ‘वॉटर ऑडिट’ आणि ‘बॅलन्सशीट’ची संकल्पना मांडली असून, ही अभिनव योजना राज्यात सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. सध्या सर्वत्र जमिनीच्या नोंदीसाठी ‘सातबारा’ उतारा अस्तित्वात आहे, मात्र पाण्यासाठी अशी कोणतीही नोंद प्रणाली नाही. पाण्याला जागतिक स्तरावर जो मान आणि दर्जा मिळायला हवा, तो सध्या मिळत नाही. एकदा पाण्याचे ऑडीट झाले की, त्याचा वापर कसा करायचा याबाबत काळजी घेतली जाईल. जोपर्यंत पाण्याचा वापर रेकॉर्ड केला जात नाही, तोपर्यंत त्यावर नियंत्रण राहणार नाही आणि लोकांची पाण्याचा वापर करण्याबाबतची जबाबदारीही निश्चित होणार नाही. याच उद्देशाने ‘ब्लू ग्रीन अर्बन डेव्हलपमेंट’च्या धर्तीवर हे महत्त्वाचे पाऊल उचलण्यात येत आहे.

या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी अक्रेरियमचे प्रमुख डॉ. सुब्रमन्यम कंसूर, जलाभ्यासक डॉ. अविनाश कदम आणि उदय नायर यांनी एकत्रितपणे ‘वॉटर अकाऊंटिंग फ्रेमवर्क’ आणि ‘वॉटर बॅलन्सशीट’ची अद्ययावत संकल्पना विकसित केली आहे. या अंतर्गत पाण्याचे तीन टप्प्यांत ऑडिट केले जाणार असून, त्याचे दरवर्षी वर्गीकरण केले जाईल. या प्रणालीमुळे ग्रामपंचायत किंवा पाणलोट क्षेत्रातील पाण्याचा साठा, आवक, जावक आणि शिल्लक पाणी याचा पारदर्शक ताळेबंद ठेवता येईल.

या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे केवळ पाण्याचे मोजमाप होणार नाही, तर पाण्याचे संवर्धन करणाऱ्यांना ‘अक्रेडिट्स’च्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाईल. यामुळे ग्रामीण भागात पाण्याचा वापर अधिक जबाबदारीने आणि पारदर्शकपणे होईल, व भविष्यात एक मोठी ‘वॉटर इकॉनॉमी’ उभी राहण्यास मदत मिळेल. महाराष्ट्र राज्य हा प्रयोग राबविणारे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

## आ. हेमंत पाटील छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान राजस्तरीय समितीवर

**नांदेड (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान या राज्य शासनाच्या राज्यस्तरीय समितीवर मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील यांची सदस्य निवड करण्यात आली आहे.



या अभियानाच्या अनुषंगाने आमदार हेमंत पाटील यांच्याकडे नांदेड, हिंगोली आणि यवतमाळ जिल्ह्याचे प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे अध्यक्षतेखाली ही निवड करण्यात आल्याने खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या प्रश्नाला न्याय मिळेल यात दुमत नाही. आमदार हेमंत पाटील हे लोकसभा सदस्य असल्यापासून शेतकरी हितासाठी आणि त्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्य करून त्यांना न्याय मिळवून दिला आहे. तसेच वसमत येथे सुरू असलेल्या हळद संशोधन केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी कार्य करत आहेत. या अभियानाच्या माध्यमातून सक्रिय सहभाग घेऊन ज्या ठिकाणी शिबीर सुरू आहेत त्याठिकाणचा दौरा करून अभियान यशस्वीरीत्या पार पाडावे यासाठी सातत्याने प्रयत्न करावे. शासन व जनता यातील दुवा म्हणून सदैव कार्य करण्यात यावे. आमदार हेमंत पाटील यांची या समितीवर निवड झाल्यामुळे सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध, कोणत्याही प्रकारची इंधनटंचाई नाही –छगन भुजबळ

**मुंबई (प्रतिनिधी)–** ग्रामीण भागामध्ये पेट्रोल पंपावर लांबच्या लांब रांगा लागत आहे. पेट्रोल पंपावर दिवसभर शेतकरी डिझेल घेण्यासाठी रांगेत उभा आहे. पण, राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, कोणत्याही प्रकारची इंधनटंचाई नाही, असं राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी स्पष्ट केलं आहे. मात्र, काही भागांत अफवांमुळे नागरिकांकडून अतिरिक्त इंधन खरेदी होत असल्याने पेट्रोल-डिझेल विक्रीत लक्षणीय वाढ झाल्याचं समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून अनावश्यक साठा करू नये, असं आवाहनच भुजबळ यांनी केलं.

राज्यातील जिल्हानिहाय विक्रीच्या आकडेवारीनुसार दैनंदिन विक्रीत मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे. राज्यात पेट्रोल विक्रीत सुमारे २३ टक्के तर डिझेल विक्रीत तब्बल ५२ टक्के वाढ झाली आहे. अकोला इथं पेट्रोल विक्रीत ४४ टक्के, बुलढाणा येथे ४७ टक्के, जालना येथे ४९ टक्के तर वर्धा इथं ४३ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. डिझेल विक्रीतही अनेक जिल्ह्यांत ६० ते १०० टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याची माहिती देण्यात आली.

## नांदेडमार्गे हैदराबाद-जयपूर ट्रेन २४ जुलैपासून कायमस्वरूपी धावणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेने नांदेडमार्गे हैदराबाद-जयपूर ही हिंगोली साप्ताहिक ट्रेन दि.२४ जुलैपासून कायमस्वरूपी चालवण्याची घोषणा केली आहे.



ट्रेन क्रमांक १७०७९ हैदराबाद-जयपूर ट्रेन हैदराबादहून दर शुक्रवारी सायंकाळी ७.५० वाजता निजामाबादमार्गे आणि दर शनिवारी रात्री १२.४८ वाजता मुदखेड, दुपारी १.१५ वाजता नांदेड, २.०५ वाजता पूर्णा, २.४४ वाजता वसमत, ३.२९ वाजता हिंगोली, ४.०९ वाजता हिंगोली, ४.०९ वा खांडवा, हरदा, भोपाळ उज्जेन, अजमेर. दर रविवारी पहाटे ५.२५ वाजता जयपूरला पोहोचेल. दि.२६ जुलैपासून परतीच्या प्रवासात १७०८० जयपूर-हैदराबाद साप्ताहिक गाडी जयपूरहून दर रविवारी दुपारी ३.३० वाजता अजमेर, भोपाळ, खांडवा मार्गे अकोला येथे दुपारी ३.१० वाजता, वाशिम येथे दुपारी ४.१४ वाजता, हिंगोली येथे दुपारी ४.५९ वाजता, ६५० वाजता हिंगोली येथे दुपारी ४.५९ वाजता, बसमत येथे दुपारी ३.३० वाजता, नानूर येथे दुपारी ३.१० वाजता पोहोचेल. रात्री ८.०५ वाजता मुदखेड, ९.१८ वाजता निजामाबाद मार्गे. मंगळवारी पहाटे ५ वाजता ते हैदराबादला पोहोचेल. ट्रेनला २२ एलएचबी डबे असतील.

## लातूरमध्ये ‘नीट’ पेपरफुटीनंतर विद्यार्थिनीने जीवन संपवलं

**लातूर (प्रतिनिधी)–** लातूर तालुक्यातील गोंदेगाव गावातील एका विद्यार्थिनीने ‘नीट’ परीक्षेच्या तणावातून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी विद्यार्थिनीच्या वडिलांनी गातेगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या जबाबामधून ही माहिती समोर आली आहे.

अशोक विठ्ठल सोनवणे यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबानूसार त्यांची मुलगी मैथिली ही यावर्षी बारावी परीक्षेत ५१.५० टक्के गुणांनी उत्तीर्ण झाली होती. डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ती ‘नीट’ परीक्षेची तयारी करत होती. तसेच सीईटी परीक्षाही तिने दिली होती. नीट परीक्षेतील पेपरफुटी प्रकरण समोर आल्यानंतर परीक्षा रद्द करण्यात आली. त्यामुळे मैथिली मानसिक तणावाखाली गेली होती. माझा अभ्यास चांगला झाला होता, पेपरही चांगला गेला होता. पण आता पुढे काय होईल, अशी चिंता ती सतत व्यक्त करत असल्याचे वडिलांनी जबाबात म्हटलं आहे.

१६ मे रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास मैथिली घरात दिसत नसल्याने कुटुंबीयांनी शोध घेतला. त्यावेळी शेतातील लिंबाच्या झाडाला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत ती आढळून आली. कुटुंबीयांनी तातडीने तिला खाली उतरवून मुरूड येथील सरकारी दवाखान्यात नेले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

पोलिसांनी पंचनामा करून शवविच्छेदनासाठी मृतदेह पाठवला. पुढे अंत्यविधी गोंदेगाव गावात करण्यात आला. वडील अशोक सोनवणे यांनी दिलेल्या जबाबात मुलीच्या मृत्यूबाबत कोणावरही संशय किंवा तक्रार नाही असे नमूद केले आहे. वडिलांच्या या जबाबानंतर पोलिसही चक्रावले. लातूरच्या ट्युशन एरियावर प्रशासनाकडून कठोर पावले उचलत येथील क्लासेस, हॉस्टेल्स तात्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहे. ‘नीट’ पेपर फुटी प्रकरणानंतर चर्चेत आलेल्या लातूरच्या तथाकथित ‘ट्युशन एरिया’वर आता प्रशासनाने मोठी कारवाई सुरू केली आहे. लातूर जिल्हा उद्योग केंद्राने लातूर इंडस्ट्रियल इस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीमधील उत्पादनासाठी मंजूर गाळ्यांमध्ये सुरू असलेले सर्व व्यावसायिक उपक्रम तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

### लातूरमधील आणखी एक डॉक्टर सीबीआयच्या राडरवर

लातूरमधील प्रसिद्ध प्रसूती रोग आणि आयव्हीएफ तज्ज्ञ डॉक्टर आता सीबीआयच्या रडारवर आले आहेत. सीबीआयच्या पथकाने संबंधित डॉक्टरांना चौकशीसाठी लातूरमधील अस्थायी कार्यालयात आणल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात लातूरमधील पाचव्या डॉक्टरांची चौकशी सुरू असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणाशी संबंधित अधिक माहिती गोळा करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. अशातच आता लातूरमधून या प्रकरणी महत्वाची अपडेट समोर येत आहे. पाचवा डॉक्टरदेखील सीबीआयच्या रडारवर असून, त्याची चौकशी सुरु असल्याची माहिती मिळत आहे.

## महाराष्ट्रावर आता संकटाचे दुहेरी ढग, २३ जिल्ह्यांना अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील हवामानात पुन्हा एकदा मोठा बदल पाहायला मिळत आहे. राज्यातील कोकण, मुंबई महानगर परिसर आणि विदर्भातील मिळून ६ जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा येलो अलर्ट, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील ११ जिल्ह्यांमध्ये पावसाचा येलो अलर्ट, विदर्भातील ४ जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा रेड अलर्ट तर विदर्भातीलच २ जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.


मराठवाड्यातील बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये अधिकृत अलर्ट नसला तरी काही भागांत हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. कोकण विभागातील पालघर, ठाणे आणि मुंबई या जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## इंधन दरवाढीविरोधात काँग्रेसचे आज राज्यभर आंदोलन

**मुंबई (प्रतिनिधी)–** देशातील जनतेवर इंधनदरवाढीचे संकट ओढवले असून या सततच्या इंधन दरवाढीविरोधात काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेतला आहे. पेट्रोल, डिझेल दरवाढीचा निषेध म्हणून काँग्रेसच्या वतीने आज, मंगळवारी प्रत्येक जिल्ह्यात आंदोलन छेडण्यात येणार आहे. सरकारने ही दरवाढ मागे घ्यावी आणि जनतेची सुरु असलेली लूट थांबवावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे.

इंधन दरवाढीवरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केंद्र सरकारवर सोमवारी जोरदार टीका केली. सत्तेत आल्यास पेट्रोल, डिझेल ३५ रुपये लिटरने देऊ अशा राणा भिमदेवी थाटात घोषणा करणारे मागील १२ वर्षापासून सत्तेत असताना पेट्रोल-डिझेल-एलपीजी सिलेंडरच्या किंमती गगनाला भिडलेल्या आहेत. मागील ११ दिवसातच पेट्रोल डिझेलच्या किमती ८ रुपये प्रति लिटरने वाढवल्या आहेत. इराण युद्धाच्या नावाखाली केलेली ही दरवाढ आधीच महागाईने पिचलेल्या जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली आहे.

इंधन दरवाढ सर्वसामान्य जनतेच्या खिशावर दरोडा टाकणारी असून सरकारने ती तात्काळ मागे घ्यावी. महागाई नियंत्रणात ठेवता येत नसेल तर नरेंद्र मोदींनी खुर्ची सोडावी, अशी टीकाही त्यांनी केला. इराण युद्धाचे नाव पुढे करून केलेली दरवाढ ही दिशाभूल करणारी आहे. गेल्या १२ वर्षांत मोदी सरकारने पेट्रोलच्या किमती ३८ टक्क्यांनी तर डिझेलच्या किमती ६२ टक्क्यांनी वाढवल्या आहेत. त्यावेळी तर इराण-इस्त्राईलचे युद्ध नव्हते, याकडे सपकाळ यांनी लक्ष वेधले आहे.




## पार्थ पवारांकडून राष्ट्रवादीच्या विधानपरिषद आमदारास राजीनामा देण्याची सुचना

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवा नेतृत्वाकडून आमदार इद्रीस नायकवाडी यांना पार्थ पवार यांच्याकडून राजीनामा मागण्यात आल्याची माहिती आहे.

गेल्या १५ दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री यांचे ओएसडी यांनी इद्रीस नायकवडी यांची भेट घेऊन राजीनामा देण्याबाबत पक्षाकडून सूचना देण्यात आल्याची माहिती त्यांना दिली. मात्र, इद्रीस नायकवडी यांच्याकडून आपण राजीनामा देणार नसल्याची ठाम भूमिका मांडण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदारांची मुंबईत बैठक होत असून या बैठकीत राजीनाम्याचा विषय चर्चेला येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

इद्रीस नायकवडी हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून राज्यपाल नियुक्त कोट्यातून आमदार आहेत. दिवंगत नेते अजित पवार यांनी अल्पसंख्यांक चेहरा म्हणून इद्रीस नायकवाडी यांना विधानपरिषद आमदारकीची संधी दिली होती. मात्र, अजित पवारांच्या निधनानंतर आता पक्षातील नेतृत्वाकडून त्यांना राजीनामा मागितला जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

**मी राजीनामा देणार नाही –आमदार इद्रीस**

मला पक्षाकडून किंवा कुठल्याही नेत्याकडून तसं सांगण्यात आलं नाही. तरीही मंगळवारी पक्षाच्या बैठकीत मी याबाबत चर्चा करेल असे स्पष्टीकरण आमदार इद्रीस नायकवाडी यांनी दिले.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# मातृत्व नाकारणारी स्त्री : धोक्याची घंटा?

आज भारतीय समाज एका संक्रमणकाळातून जात आहे. विवाह, मातृत्व आणि कुटुंब यांविषयीच्या पारंपरिक संकल्पना नव्याने तपासल्या जात आहेत. अशा वेळी स्त्रीच्या निवडीला मान्यता देणे हे आधुनिक आणि संवेदनशील समाजाचे लक्षण ठरेल. कारण स्त्रीची ओळख केवळ आई म्हणून नसून, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून स्वीकारली गेली तरच खऱ्या अर्थाने समानतेचा मार्ग खुला होईल. भारतीय समाजात स्त्रीचे अस्तित्त्व दीर्घकाळ 'आई', 'पत्नी' आणि 'संस्कारक' या चौकटीतच पाहिले गेले. विवाहानंतर मातृत्व स्वीकारणे ही स्त्रीची नैसर्गिक आणि अपरिहार्य जबाबदारी मानली गेली. मात्र बदलत्या सामाजिक-आर्थिक वास्तवात आता या संकल्पनांना आव्हान दिले जात आहे. विशेषतः शहरी मध्यमवर्गीय समाजात 'डबल इन्कम नो किड्स' या विकृत संस्कृतीला वाढता प्रतिसाद मिळताना दिसत आहे. करिअर, आर्थिक स्थैर्य, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि मानसिक आरोग्य यांना प्राधान्य देत अनेक महिला मातृत्व पुढे ढकलत आहेत किंवा जाणीवपूर्वक अपत्य न घेण्याचा निर्णय घेत आहेत. ही केवळ जीवनशैलीतील बदलाची बाब नसून स्त्रीच्या स्वायत्ततेशी निगडित सामाजिक परिवर्तनाची नांदी आहे. भारतीय कुटुंबव्यवस्थेत बालसंगोपनाची मुख्य जबाबदारी आजही महिलांवरच येते. नोकरी सांभाळत घरकाम, मुलांचे शिक्षण, सांस्कृतिक उपक्रम आणि कुटुंबियांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा ताण महिलांवर असतो. पुरुषांच्या तुलनेत महिलांकडून अधिक त्यागाची अपेक्षा केली जाते. त्यामुळे अनेक सुशिक्षित आणि व्यावसायिक महिलांनी मातृत्वाबाबत स्वतंत्र निर्णय घेण्यास सुरुवात केली आहे. वाढती महागाई, शिक्षणाचा खर्च, करिअरमधील स्पर्धा आणि वैयक्तिक आयुष्याचा समतोल या कारणांमुळेही हा दृष्टिकोन अधिक ठळक होत आहे. याच पार्श्वभूमीवर गोवा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटने केलेल्या संशोधनाने एक महत्त्वाचा सामाजिक पैलू समोर आणला आहे. तसेच एका आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, अपत्य नसलेल्या महिलांकडे कंपन्या 'आदर्श कर्मचारी' म्हणून पाहतात. मध्यमवर्गीय, उच्चशिक्षित आणि करिअरकेंद्री महिलांना संस्थात्मक पातळीवर अधिक सक्षम आणि कामासाठी उपलब्ध मानले जाते. मात्र या प्रतिमे-मागे सूक्ष्म भेदभावाची एक वेगळीच बाजू दडलेली आहे. संशोधनानुसार अनेक कार्यस्थळांवर स्त्रीत्व आणि मातृत्व यांची सांगड अजूनही अभिन्न मानली जाते. त्यामुळे मातृत्व न स्वीकारणाऱ्या महिलांना अप्रत्यक्षपणे वेगळे किंवा अपूर्ण समजले जाते. हा भेदभाव उघड स्वरूपाचा नसून सूचक टिप्पण्या, वागणुकीतील फरक आणि सामाजिक दडपण अशा स्वरूपात दिसून येतो. विशेष म्हणजे हा दबाव केवळ पुरुषांकडूनच नव्हे, तर इतर महिला सहकाऱ्यांकडूनही जाणवतो. करिअरसाठी मुलांना नाकारले, आयुष्य अपूर्ण आहे किंवा स्वार्थी निर्णय अशा सामाजिक धारणा अजूनही महिलांच्या वैयक्तिक निवडींवर प्रश्नचिन्ह उभे करतात. ही परिस्थिती भारतीय समाजातील खोलवर रुजलेल्या पितृसत्ताक मानसिकतेचे प्रतीक आहे. पुरुषाने करिअरला प्राधान्य दिल्यास त्याचे कौतुक होते; पण स्त्रीने स्वतःच्या आयुष्याबद्दल स्वतंत्र निर्णय घेतल्यास तिच्या नैतिकतेवरच प्रश्न उपस्थित होतात. स्त्रीचे यश अजूनही तिच्या मातृत्वाशी जोडून पाहिले जाते. परिणामी अपत्य नसलेल्या महिलांना सतत स्वतःचे निर्णय योग्य ठरविण्याचा मानसिक ताण सहन करावा लागतो. मात्र बदलत्या काळात स्त्रीची ओळख केवळ मातृत्वापुरती मर्यादित ठेवणे अन्यायकारक ठरेल. प्रत्येक व्यक्तीची जीवनशैली, प्राधान्यक्रम आणि स्वप्ने वेगळी असतात. काही महिलांसाठी मातृत्व हे आयुष्याचे ध्येय असू शकते, तर काहींसाठी करिअर, वैयक्तिक स्वातंत्र्य किंवा अन्य सामाजिक योगदान अधिक महत्त्वाचे असू शकते. या दोन्ही निवडी तितक्याच वैध आणि सन्मानास पात्र आहेत. प्रजननाचा निर्णय हा पूर्णपणे वैयक्तिक असतो आणि त्यावरून एखाद्या महिलेची सामाजिक किंवा व्यावसायिक पात्रता ठरवणे अयोग्य आहे. कार्यस्थळांवर विविधता आणि समावेशकतेबाबत मोठ्या घोषणा केल्या जातात; परंतु खऱ्या अर्थाने समावेशक वातावरण निर्माण करायचे असेल, तर महिलांच्या वैयक्तिक निवडींचा आदर करणे आवश्यक आहे. मातृत्व स्वीकारणाऱ्या आणि न स्वीकारणाऱ्या दोन्ही महिलांकडे समान संवेदनशीलतेने पाहिले गेले पाहिजे. महिलांना त्यांच्या वैयक्तिक आयुष्याच्या आधारावर नव्हे, तर त्यांच्या कौशल्य, क्षमता आणि योगदानाच्या आधारे मूल्यांकन करण्याची संस्कृती विकसित होणे गरजेचे आहे. स्त्रीला मातृत्व स्वीकारण्याचा किंवा त्यागण्याचा अधिकार आहे, यात शंका नाही. परंतु आजची काही तरुण मुलींमधील मूल होऊ न देण्याची मानसिकता ही देशाच्या दृष्टिकोनातून अत्यंत घातक आहे. ही मानसिकता दीर्घकाळ राहिल्यास भारतातील कुटुंब व्यवस्था नष्ट होईल. त्याचप्रमाणे मूळ भारतीयांची संख्या कमी होऊन दहशतवाद्यांची संख्या माजेल आणि त्यावेळेस देश संपलेला असेल. स्त्रीच आई होऊ शकते, मनुष्य मुलांना जन्म घालू शकत नाहीत हे नैसर्गिक सत्य कोणीही नाकारू शकत नाही. याचाही विचार होणे तेवढेच गरजेचे आहे.

# लोकांतील, लोकांचा लोकनेता; विलासराव देशमुख



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची आज ८१ वी जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे २६ मे १९४५ रोजी लातूरमधील बाभळगावमध्ये त्यांचा जन्म झाला. विलासरावांनी पुण्यात बी.एससी, बीए, एलएलबी यासारखे उच्च शिक्षण घेतले. शिक्षण पूर्ण झाल्यावर विलासराव आपल्या गावी बाभळगावला परतले. १९७४ साली विलासराव बाभळगावचे सरपंच झाले. १९७५ पासून ते काँग्रेसचे क्रियाशील कार्यकर्ते बनले. १९८० साली त्यांनी पहिल्यांदा लातूर विधानसभा मतदारसंघातून आमदारकीची निवडणूक लढवली आणि पहिल्याच प्रयत्नात ते आमदार म्हणून निवडून आले. १९८२ साली त्यांची महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून निवड झाली. त्यांनी कृषी, ग्रामविकास, सहकार, शिक्षण, तंत्रशिक्षण, क्रीडा व युवक कल्याण खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम पाहिले.

१९८६ साली ते महसूल आणि सहकार या महत्वाच्या खात्याचे कॅबिनेट मंत्री बनले. उद्योग आणि सांस्कृतिक खात्याचे मंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिले. मंत्री म्हणून त्यांनी केलेल्या कामाम ुळेच ते सलग तीनदा विधानसभेत निवडून गेले. मात्र १९९५ सालची विधानसभा निवडणूक त्यांना जिंकता आली नाही. १९९२-९३ साली झालेल्या दंगली आणि बॉम्बस्फोट, काँग्रेसमधील सुंदोपसुंदी, तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्यावर झालेले आर-ोप, एनरॉन प्रकरण यामुळे काँग्रेसचा पराभव झाला. काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. त्यात विलासरावांचाही समावेश होता. विलासराव देशमुख यांना जनता दलाच्या शिवाजी कव्हेकर यांनी पराभूत केले. आपल्या गडात झालेला पराभव विलासरावांना खूप लागला. विलासराव देशमुख पडावेत यासाठी तेंव्हा काँग्रेसमध्ये असलेल्या बड्या नेत्याने प्रयत्न केल्याचे तेंव्हा बोलले जात होते. १९९५ साली राज्यात भाजप-शिवसेना युतीचे सरकार आले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. काँग्रेसचे अनेक दिग्गज नेते विधिमंडळात नाही याची विलासरावांना खंत वाटत होती. त्यामुळे काहीही करून विधिमंडळात जायचे असा चंग त्यांनी बांधला. पुढच्याच वर्षी म्हणजे १९९६ साली विधानपरिषद निवडणूक लागली. मात्र काँग्रेसच्या हायकमांडने त्यांना उमेदवारी नाकारली. त्यामुळे बंडखोरी करून विधान परिषदेसाठी उभे राहा असा आग्रह त्यांना त्यांच्या समर्थकांनी केला. काँग्रेसच्याही अनेक नेत्यांनी त्यांना तसा सल्ला दिला. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी तर त्यांना थेट शिवसेनेत येण्याची ऑफर दिली मात्र सारं आयुष्य काँग्रेस संस्कृतीत गेल्याने शिवसेनेत जाणं विलासरावांना शक्य नव्हतं म्हणून ते या निवडणुकीत अपक्ष म्हणून उभे राहिले.

या निवडणुकीत शिवसेनेने त्यांना मदत केली. तरीही त्यांचा अवघ्या अर्ध्या मतांनी पराभव झाला. विधान परिषद निवडणुकीत प्रत्येक मताला ठराविक मूल्य असतं आणि मत मोजण्याची पद्धतही वेगळी असते. सलग दोन वर्षात दोन पराभव झाल्याने विलासरावांचे राजकारण संपले, विलासराव आता पुन्हा निवडून येऊ शकत नाहीत अशी टीका त्यांच्यावर होऊ लागली. मात्र हार मानतील ते विलासराव कसले? विलासरावांनी पुन्हा नव्याने सुरुवात केली. जनतेत गेले, जनतेचे प्रश्न शासन दरबारी मांडले. त्याचे परिणाम लवकरच दिसले. १९९९ साली शरद पवार काँग्रेसमधून बाहेर पडले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्याच वर्षी म्हणजे १९९९ साली विधानसभेच्या निवडणुका लागल्या. या निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस एकमेकांच्या विरोधात लढले तर शिवसेना भाजपने युतीत एकत्र निवडणुका लढवल्या. एकत्र लढूनही भाजप-सेना युतीला बहुमत मिळाले नाही. त्या दोन्ही पक्षांना मिळून १२५ जागा मिळाल्या तर स्वतंत्र लढलेल्या काँग्रेसला ७५ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला ५८ जागा मिळाल्या. निकालानंतर काँग्रेस-राष्ट्रवादी यांच्यात सरकार स्थापनेसाठी बोलणी सुरू झाली. छोट्या-मोठ्या पक्षांनी देखील काँग्रेस आघाडीला पाठिंबा देण्याचे जाहीर केले. सर्वाधिक जागा काँग्रेसच्या निवडून आल्याने काँग्रेसचाच मुख्यमंत्री होणार हे स्पष्ट झाले. काँग्रेसकडून लातूर मतदारसंघातून विलासराव देशमुख सर्वाधिक मते घेऊन जिंकून आले होते. ज्या मतदारसंघात त्यांचा पराभव झाला होता त्याच मतदारसंघात ते पुन्हा विक्रमी मतांनी निवडून आले होते. त्यामुळे मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत ते सर्वात पुढे होते, शिवाय अपक्ष म्हणून जिंकून आलेल्या आमदारांनीही विलासराव देशमुख हेच मुख्यमंत्री असावेत अशी अट ठेवल्याने काँग्रेस हायकमांडने त्यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड केली. जिंकून आलेल्या सर्व आमदारांनी विलासरावांना एकमुखी पाठिंबा दिला आणि ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले.

सलग दोन पराभव स्वीकारूनही थेट मुख्यमंत्रीपद मिळाल्याने विलासरावांची पराभवाची सल दूर झाली. काँग्रेस राष्ट्रवादी-काँग्रेस आघाडी सरकारचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी अतिशय चांगले काम केले, पण २००३ साली त्यांना राजीनामा द्यावा लागला. मात्र अवघ्या वर्षभरात म्हणजे २००४ साली त्यांची मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली २००४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिंकून आलेल्या काँग्रेसच्या सर्व आमदारांनी विलासराव देशमुख हेच मुख्यमंत्री हवेत अशी मागणी केल्याने त्यांचीच पुन्हा मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली. २००४ साली विलासराव दुसऱ्यांदा मुख्यमंत्री बनले. मुख्यमंत्री पदाच्या दुसऱ्या कार्यकाळातही त्यांनी चांगले काम केले. मात्र २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला आणि त्यांचे मुख्यमंत्रीपद गेले. मात्र अल्पावधीतच त्यांची केंद्रात कॅबिनेट मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री बनले.

१४ ऑगस्ट २०१२ रोजी विलासरावांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. त्यांचे आकस्मिक निधन महाराष्ट्रातील जनतेला धक्का देऊन गेले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोक सागरात बुडाला. विलासराव देशमुखांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि कौशल्य विकास समजून घेण्याची गरज

कौशल्य विकास श्रमाला स्पर्धात्मक आणि अधिक उत्पादक बनवून संरचनात्मक बदलाद्वारे सामाजिक-आर्थिक विकासास हातभार लावतो. हे केवळ उत्पादकता वाढवून अधिकाधिक चांगल्या नोकऱ्या निर्माण करत नाही तर लोकांचे जीवनमान सुधारते. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या अजूनही पारंपरिक उपजीविकेच्या साधनांद्वारा जीवन जगत आहे. देशातील निम्मी कामगार शक्ती ग्रामीण रोजगारात आहे आणि नव्वद टक्क्यांहून अधिक कामगार असंघटित क्षेत्रात आहेत, ज्यांची उत्पादकता कमी आहे. अशा परिस्थितीत गरिबी आणि बेरोजगारीसह देशातील अनेक सामाजिक-आर्थिक समस्यांच्या संदर्भात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि कौशल्य विकास समजून घेण्याची गरज आहे.



भारतातील सुमारे दोन तृतीयांश लोकसंख्या १५ ते ५९ वर्षे वयोगटातील आहे आणि ५४ टक्के लोकसंख्या २५ वर्षांपेक्षा कमी आहे. 'स्किल इंडिया रिपोर्ट २०१८' नुसार, भारताच्या लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचे मुख्य कारण म्हणजे पुढील सहा वर्षे लोकसंख्येचे सरासरी वय २९ वर्षांपेक्षा कमी राहील. २०१९ च्या युनिसेफच्या अहवालानुसार, २०३० पर्यंत, सुमारे ४७ टक्के भारतीय तरुणांकडे रोजगारासाठी आवश्यक शिक्षण आणि कौशल्याची कमतरता असेल, ज्यामुळे रोजगारावर परिणाम होईल. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनचा अंदाज आहे की, २०३० पर्यंत कौशल्यांमध्ये सुमारे ३० दशलक्ष अंतर असेल, ज्यामुळे भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नावर परिणाम होईल. पुढील काही वर्षांत कामगार संख्या सुमारे दोन टक्के म्हणजे सत्तर लाखांनी वाढण्याचा अंदाज आहे. मोठ्या लोकसंख्येला गरिबी आणि बेरोजगारीच्या कक्षेतून बाहेर काढायचे असेल, तर उदयोन्मुख रोजगार क्षेत्रांच्या विविध पद्धतीनुसार कौशल्य विकास करावा लागेल.

भारतातील पूर्वीची शिक्षणपद्धती उपजीविकेची हमी देत नव्हती. कौशल्यां-मधील अंतर सर्व स्तरांवर आहे. त्यामुळेच तीस टक्क्यांहून अधिक उच्च शिक्षित तरुण बेरोजगार आहेत. कुशल कामगारांची कमतरता ही नियोक्त्यांना भेडसावणारी एक अडचण आहे, ज्यामुळे त्यांच्या नवनिर्मितीच्या क्षमतेवर परिणाम होतो. भारताला कुशल मानव संसाधनाची गरज आहे जे नावीन्य आणि वाढीसाठी उत्प्रेरक म्हणून काम करू शकतात. कौशल्य विकास आणि व्यावसायिक प्रशिक्षणासाठी सार्वत्रिक पोहोच हे देशातील एक गंभीर आव्हान आहे. अनेक विद्यार्थी औपचारिक शिक्षणापासून वंचित राहतात, ज्यामुळे त्यांच्या आयुष्यातील कमाईच्या क्षमतेवर परिणाम होतो. पिढी-दर-पिढी कौशल्य हस्तांतरणामुळे पारंपरिक भारतीय व्यवसायांमध्ये उद्योजकता आणि उपजीविकेसाठी भरपूर संधी उपलब्ध आहेत. पण काळानुसार व्यवसाय आणि संधींचे स्वरूप बदलले आहे.

कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय कौशल्य विकास कार्यक्रमांचे समन्वयन करते. मेक इन इंडिया आणि स्किल इंडिया कार्यक्रम हे शिक्षण आणि कौशल्य विकासाचे आंतरसंबंध मजबूत करतात, औपचारिक कौशल्यांमध्ये तरुणांची रुची वाढवतात आणि शैक्षणिक पात्रतेसह कौशल्य प्रमाणपत्राला मान्यता देतात. सुमारे वीस मंत्रालये आणि विभागांच्या कौशल्य विकास कार्यक्रमां-द्वारे देशात एक कुशल मनुष्यबळ तयार केले जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व्यापक संज्ञानात्मक कौशल्यांवर भर देते, ज्यामध्ये अनुभव आणि तर्काद्वारे जटिल कल्पना शिकण्याची, समजून घेण्याची आणि लागू करण्याची क्षमता समाविष्ट आहे. तांत्रिक कौशल्याम ध्ये विशिष्ट कार्य करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि कौशल्य असते. डिजिटल कौशल्ये इतर सर्व कौशल्यांमध्ये प्रवेश करण्याची, व्यवस्थापित करण्याची, संवाद साधण्याची, समजून घेण्याची, मूल्यांकन करण्याची आणि स्वीकारण्याची क्षमता प्रदान करतात.

एनईपी रॉट लर्निंगऐवजी सर्जनशील आणि क्रिटिकल विचारसरणीसह आउट-ऑफ-द-बॉक्स विचार आणि निर्णय घेण्यावर लक्ष केंद्रित करावे लागेल. बहुविद्याशाखीय दृष्टिकोनासह, विद्यार्थी त्यांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम निवडण्यास सक्षम असतील. एनईपी उद्योगांच्या गरजेनुसार शिक्षणातील कौशल्य विकास अभ्यासक्रम, भारतीय तरुणांना कुशल आणि स्वावलंबी बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतील. कौशल्य विकास आणि व्यावसायिक शिक्षणाचा शैक्षणिक व्यवस्थेत समावेश करून, एनईपी केवळ उद्योगांच्या गरजेनुसार मनुष्यबळ निर्माण करणार नाही तर शिक्षणाचा दर्जाही वाढवेल. शालेय शिक्षणासोबत व्यावसायिक शिक्षणाची सांगड घालण्याचा उद्देश हा आहे की, शिक्षणाला रोजगारक्षम बनवताना कौशल्य विकासाद्वारे तरुणांना स्वावलंबी बनवणे. यामध्ये पारंपरिक कौशल्य विकासासाठी सुतारकाम, प्लंबिंग, इलेक्ट्रिशियन, फलोत्पादन, कुंभारकाम, भरतकाम-विणकाम इत्यादींचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. २०२५ पर्यंत ५० टक्के विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

राष्ट्रीय कौशल्य पात्रता फ्रेमवर्क एनएसक्यूएफ एक राष्ट्रीय स्तरावरील एकात्मिक शिक्षण आणि गुणवत्तेच्या खात्रीसाठी सक्षमतेवर आधारित कौशल्य फ्रेमवर्क आहे, जे व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण, सामान्य शिक्षण आणि तांत्रिक शिक्षण तसेच क्रॉसमध्ये क्षैतिज आणि उभ्या एकत्रीकरणासाठी अनेक संधी प्रदान करण्याचा प्रयत्न करते. - एका कौशल्याचे दुसऱ्या कौशल्याचे कौशल्य विकासाच्या पातळीशी संबंध जोडते. यामध्ये इयत्ता ९-१० मध्ये व्होकेशनल मॉड्युल हा स्वतंत्र पर्यायी विषय असेल आणि इयत्ता ११-१२ मध्ये व्होकेशनल कोर्स हा अनिवार्य विषय असेल. राज्य सरकारांनी सामान्य अभ्यासक्रमांच्या बरोबरीने व्यावसायिक अभ्यासक्रमांना मान्यता देणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार शालेय व्यावसायिक कौशल्ये उच्च शिक्षणापर्यंत वाढवता येतात. कौशल्य विकास, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रम युवकांना, विशेषत: महिलांना चांगल्या नोकऱ्यांसाठी स्पर्धा करण्यास सक्षम करतील. अशा प्रयत्नांमध्ये स्थानिक नियोक्त्यांना सहभागी करून घेणे महत्त्वाचे आहे जेणेकरून अभ्यासक्रम श्रमिक बाजाराच्या गरजेनुसार तयार केला जाईल.

नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क एनसीआरएफ हे राष्ट्रीय स्तरावर क्रेडिट जमा करणे आणि हस्तांतरण प्रणालीचे औपचारिकीकरण करून कौशल्य विकास हा शिक्षण व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनवणारा एक दस्तऐवज आहे. हे सामान्य शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण एकत्रित करून कौशल्य विकासासह दर्जेदार शिक्षणाच्या संधी सुनिश्चित करेल. एनसीआरएफ हे सर्वसमावेशक, बहुविद्याशाखीय, सर्वांगीण शिक्षणासाठी एक फ्रेमवर्क आहे, जे विषयांच्या पर्यायांसह आणि त्यांच्या सर्जनशील संयोजनांसह गरजेवर आधारित अभ्यासक्रम ऑफर करेल. एनसीआरएफ शिकण्याच्या विविध क्षेत्रांना समान महत्त्व देऊन कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करते. उच्च शिक्षणातील कौशल्य प्रशिक्षणासाठी क्रेडिट कमाईची तरतूद कर्मचाऱ्यांची कौशल्य पातळी वाढवून, प्रादेशिक विकासासाठी कुशल कामगार उपलब्ध करून प्रशिक्षण आणि रोजगाराला प्रोत्साहन देईल. कौशल्य विकास कार्यक्रमांना वित्त आणि गुणवत्तेच्या समस्यांचा सामना करावा लागतो, तसेच उच्च खर्च अपेक्षित असल्याने वंचित तरुणांना या कार्यक्रमांमध्ये मर्यादित प्रवेश असतो, आणि ही एक समस्या आहे. अनुभव दर्शवितो की उच्च कौशल्य विकास असलेले देश देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय श्रमिक बाजारातील आव्हानांना प्रभावीपणे प्रतिसाद देतात.

एनईपी २०२० मुळे शिक्षण आणि कौशल्य विकास यातील पृथक्करण संपुष्टात येईल. तो दिवस दूर नाही जेव्हा भारतातील तरुण, कौशल्य विकास आणि व्यावसायिक, रोजगारक्षम शिक्षणाद्वारे, उपजीविका शोधणारे नव्हे तर रोजगार देणारा बनतील. भारताने केवळ कौशल्य विकासावरच नव्हे तर कौशल्यावर आधारित रोजगार संधींवरही भर दिला पाहिजे. उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य विकास केल्यास सुशिक्षित बेरोजगारीच्या संकटातून सुटका होऊ शकते. सत्य हे आहे की, भारतातील गरिबीसह ग्रामीण बेरोजगारी आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न कौशल्य विकासानेच सुटू शकतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला या दिशेने प्रात्यक्षिक आधारावर प्रामाणिक प्रयत्न करावे लागतील, हाही त्याच्या मूल्यमापनाचा आधार असेल.

-मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# उद्योगधंदे उभारता येतात, पण...

बेरोजगारी ही सध्या एक भारत देशातील भीषण समस्या आहे. प्रत्येकांच्या हाताला काम मिळायलाच हवं. असं देशा-तील प्रत्येक माणसाचं म्हणणं. तसं तरुण खुश तर जनता खुश. मग सरकारही खुश आणि देशही खुश. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. परंतु सध्याची देशाची स्थिती तशी नाही. बेरोजगारी सतत वाढत चाललेली आहे. त्यामानानं सरकारी उद्योगधंदे नाहीत. उद्योगधंदे उभारता येवू शकतात. परंतु त्यात अनेक अडचणी आहेत व मुख्य अडचण आहे पैसा. तो पैसा राजकारणी मंडळी राजकारण करण्यासाठी वापरतात. ज्यातून उद्योगधंदे उभे राहात नाही व बेरोजगारीची भीषण समस्या निर्माण होत आहे.

प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या धर्माला आज चिकटून आहेच. तसाच तो प्रत्येकच राजकीय पक्षालाही चिकटून आहेच. जे राजकीय पक्ष त्यांना आश्वासन देतात. काही आश्वासनाची परिपुर्ती करतात. देशात उद्योगधंदेही काढतात आणि असे उद्योगधंदे काढत असतांना गवगवा जास्त व कार्य कमी प्रमाणात करतात.

एक असाच विषय. काक्रोज जनता पार्टी का निर्माण झाली. हा माझा प्रश्न? त्यावर मी लिहिलं की देशात बेरोजग-ारी निर्माण झाली. लोकांना सरकारी नोकऱ्या मिळत नाही. बेरोजगार जास्त झाले. त्यामानानं उद्योगधंदे कमी झाले. देशात उद्योगधंदे निर्माण होत नाहीत. अन् होतात तर ते सरकारी उद्योगधंदे नसतात. त्यावर एका व्यक्तीचं वक्तव्य. वक्तव्य होत, 'आ. सर, आपण खरोखर अभ्यास केला आहे का की खरंच कामे मिळत नाही वगैरे? कामं म्हणजे काय, फक्त सरकारी कंपनी मधेच करायला पाहिजे अशी कामं म्हणायची आ-हेत काय? कामं कोणत्याही स्वरुपाची का असेना, युवकांनी करायला हवीत. त्यासाठी चिडून जायला नकोच.'

पुढील व्यक्तीमहोदयाचं त्यावर उत्तर. त्यावर मी म्हटलं की देशातील तरुणाई उच्च शिक्षण जर शिकली तर त्या उच्चशिक्षीत तरुणांनी चांगल्या नोकरीची अपेक्षा धरु नये काय? माझं मत होतं, चांगली नोकरी अर्थात सरकारी नोकरी. त्यावर उत्तर देत पुढील व्यक्तींचं म्हणणं. त्यांनी वेगवेगळी उदाहरणं दिलीत. त्यांनी उदाहरणं देवून म्हटलं.

१) एवढे इन्फ्रास्ट्रक्चर उभं होत आहे तर ती कामे कोण करत आहेत? अजून तरी मशीन नाहीच. माणसंच आहेत. २) हे ब्लिंकिट वगैरे सारखे ऑनलाईन प्लॅटफॉर्मला अनेक डिलिव्हरी बॉय लागतात. अगदी गावागावात पण. ती कामे कोण करत आहे? माणसंच ना. ३) सध्या उबर /भारत/ओला वगैरेचे ड्रायव्हर आणि त्यांची टॅक्सी मेन्टेन करणाऱ्या कंपन्यांत कामे कोण करत आहे? माणसंच ना. ४) स्विगी/झोमॅटो वर खायच्या वस्तू विकणारे कोण आहेत? माणसंच ना.

ही वर जी उदाहरणे दिली आहेत. त्यात चांगला बिझनेस आहे आणि लोक करत आहे. आपल्या माहितीत असलेली मुले स्वतः काही करत नाही आणि सरकारला उगाच ब्लेम करतात. त्याचं कारण म्हणजे बाहेरच्या विदेशी शत्रूंजवळून पैसे घेऊन फक्त भारतात कुठले तरी आंदोलन करु पाहणे, जेणेकरुन भारतात अशांतता पसरावी जेणेकरुन इथं जे बाहेरचे लोक इन्व्हेस्ट करत आहे ते बंद होईल. जरा आजुबाजूच्या देशांचा अभ्यास करा. हेच करुन तिथल्या जेन जी ला उकसवण्यात आले आणि सरकार बदलण्यात आले. तुम्हाला वाटते आहे का की आपली जेन जी एवढी मूर्ख आहे की असे काही करेल? नाही करणार. कारण प्रत्येक तरुण पाहतो आहे भारताची बदललेली स्थिती. बदललेले त्याचे ग्लोबल स्थान. आज मी भारतीय म्हटले की कसे वागतात. विदेश मध्ये ते प्रत्येक जण बघत आहे. तुम्हाला जरी ही पार्टी योग्य वाटत असली तरी. ही पार्टी मुळात चुकीच्या वेळेस जन्माला आली आहे आणि चुकीच्या माणसाने बनवली आहे. जो स्वतः विदेशातच शिकतो.

देशातील वीस टक्के जनताच तेवढी गरीब आणि दारिद्र्य रेषेखालील आहे. बाकीचे नावापुरतेच दारिद्र्य रेषेखालील आहेत. दारिद्र्य रेषेखालील लोकं म्हणजे नेमके कोण? ज्यांना एकापेक्षा जास्त मुलं आहेत असे, ज्यांच्याकडे पक्की इमारत आहे असे, ज्यांच्या नावावर दोन चाकी गाडी आहेत असे की जे सरकारी नोकरीवर आहेत असे? आजच्या काळात राशनचा लाभ घेणारी मंडळी ही पक्क्या इमारतीत राहतात. चालवायला दोनचाकी गाडी वापरतात. घरात एकच्या वर मुलं आहेत. परंतु राशनच्या दुकानातून गहू, तांदूळ निःशुल्क मिळते म्हणून उचलतात व घरी नेवून इतरांना जास्त दामात विकूनही टाकतात. अलिकडील काळात तर असे तांदूळ, गहू घेणारे लोकंच वस्तीवस्तीतून फिरत असतात. त्याचं काय? राशनचा तांदूळ, गहू त्यांनाच मिळावा. ज्या घरी एकच अपत्य आहे, ते झोपड्यात राहतात, त्यांच्या घरी त्यांच्या नावावर एक सायकल आहे, गाडी नाही अन् वार्षिक मिळकत एक लाखापेक्षा कमी आहे. तसं पाहिल्यास आज देशात कोणीच गरीब असेल, असं वाटत नाही. हे सरकारलाही एका क्लिकवर दिसतं. तरीही सरकार निमूटपणे लोकांची शहानिशा न करता राशनमध्ये निःशुल्क तांदूळ, गहू देत असतं अन् यात माहीत जरी झालं की सरकारच्या तिजोरीतून तांदूळ, गव्हाचा अपहार झाला. तरी तो पैसा वसूल केला जात नाही. म्हणूनच सर्रासपणे लोकं सरकारी योजनेचा लाभ घेत असतात. आज असाच लाभ जीवन-धारा विहीर बांधकाम, इंदिरा आवास योजना, विधवा पेन्शन योजना, वृद्ध पेन्शन योजना, अशा कितीतरी योजनेतून जनतेनं मिळविलेला आहे व पैसा लाटला आहे. त्यातच सरकारच्या पैशाचा अपहार केलेला आहे. तोच पैसा वाचला असता तर देशात खरंच सरकारी उद्योगधंदे उभे राहू शकले असते.

देशातील तरुणाईला निःशुल्क राशन नको. त्यांना हाताला काम हवं. जे काम सरकारच देऊ शकतं. सरकारी उद्योगधंदे निर्माण करून. परंतु सरकारनं वरील प्रकारच्या गोष्टी केल्या. प्रत्येक परीवाराला शहानिशा न करता योजना दिल्या. राशन निःशुल्क दिलं वा पेन्शन दिल्या. लाडक्या बहिणींना पैसे वाटप करीत बसले. टॅक्स वसूल केले नाही. लोकांना बँका डुबवून पळू दिले तर देशात पैसाच उरणार नाही, उद्योग धंदे उभे करण्यासाठी. मग सुशिक्षित तरुणाईंना काम मिळणार नाही. बेरोजगारी सतत वाढतच जाईल व एक वेळ अशी येईल की कॉकरोच जनता पार्टी एक ट्रेलर होतं. ती तरुणाई खवळेल व सरकारलाच एक दिवस नेस्तनाबूत केल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच सरकारनंही त्यावर विचार करावा आणि तरुणाईसाठी नक्कीच लवकर पावलं उचलावीत.

विनाकारण पैशाचा होणारा अपव्यय बंद करावा. सरकारी नोकरदाराच्या खिशातून एक दोन दिवसाचाही पैसा काढावा. प्रत्येक नागरिकांकडून टॅक्स वसूल करावा व तरुणाईचा प्रश्न सोडवावा. सरकारी उद्योग धंदे निर्माण करुन. जेणेकरुन तरुण खुश तर देशही खुश व देश खुश तर सरकारही खुश. अन् ज्या देशातील तरुणाई खुश असेल, त्या देशातील जनताही आपोआपच खुश झाल्याशिवाय राहणार नाही. हे तेवढंच खरं. परंतु त्यासाठी सरकारी उद्योगधंदे उभारावेच लागतील. विनाकारण सरकारनं देशातील लोकांना खुश ठेवण्यासाठी सरकारी योजनांचा लाभ देवून मतांसाठी राजकारण करु नये म्हणजे झालं. कारण सध्या देशाला सुशिक्षित बेरोजगारीची भीषण समस्या सतावत आहे बऱ्याच दिवसांपासून. त्या समस्येत आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

-अंकुश शिंगाडे
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# सेवानिवृत्तीनंतरचे जीवन सक्षम व्हावे; आर्थिक व सायबर साक्षरतेवर भर

## जिल्हा परिषदेच्या सेवानिवृत्तीपूर्व प्रशिक्षण शिबिराच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने विविध विभागातील पुढील सहा महिन्यांत सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या सेवानिवृत्तीपूर्व प्रशिक्षण शिबिराच्या दुसऱ्या टप्प्याला सोमवारी प्रारंभ झाला. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



यावेळी एसबीआयचे व्यवस्थापक चव्हाण व सतीश राऊत यांनी सेवानिवृत्तीनंतरच्या आर्थिक नियोजनाविषयी मार्गदर्शन केले. सेवानिवृत्तीच्या वेळी मिळणाऱ्या निधीचे योग्य नियोजन करणे आवश्यक असून अधिकृत व विश्वासार्ह बँकांमध्ये गुंतवणूक करावी, असा सल्ला त्यांनी दिला. उतारवयात आर्थिक सुरक्षितता महत्त्वाची असल्याचे सांगताना प्रत्येक आर्थिक व्यवहारात नॉमिनीची नोंद असणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सायबर क्राईम विभागाचे पोलीस निरीक्षक वसंत सर्पे यांनी सायबर साक्षरता ही काळाची गरज या विषयावर मार्गदर्शन केले. मोबाईलवर येणाऱ्या फ्रॉड लिंक, एपीके फाईल, फेसबुक व सोशल मीडियावरील भुलवणारे संदेश यांची ओळख पटविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. सायबर फसवणुकीसंदर्भात तक्रार करण्यासाठी १९३० या हेल्पलाईन क्रमांकाचा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले. तसेच विविध ऑनलाइन संकेतस्थळे व सुरक्षिततेच्या उपायांविषयी उपस्थितांना माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमात आहारतज्ज्ञ डॉ. मनीषा जाधव यांनी उत्तम आरोग्यासाठी गुरुकिल्ली या विषयावर व्याख्यान दिले. योग्य आहार, नियमित योगाभ्यास, आरोग्यपूर्ण जीवनशैली आणि मानसिक स्वास्थ्य याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपलेखा व वृत्ताधिकारी विशाल हिरवे यांनी केले, तर सूत्रसंचालन मिलिंद व्यवहारे यांनी केले. यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, सहाय्यक गट विकास अधिकारी हातमोडे, उपशिक्षणाधिकारी राठोड आदींची उपस्थिती होती. या प्रशिक्षण शिबिराचा समारोप सोमवारी करण्यात येणार आहे.

> जिल्हापरिषदेतंर्गत विविध विभागांतील पुढील सहा महिन्यांत सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सेवानिवृत्तीनंतरचे जीवन सक्षम, सुरक्षित व आनंदी राहावे हा या प्रशिक्षणामागील मुख्य उद्देश आहे. आरोग्य, आर्थिक सुरक्षितता आणि सकारात्मक जीवनशैली याविषयी या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात येत आहे. हा कर्मचाऱ्यांच्या भविष्याची काळजी घेणारा उपक्रम आहे.
> **–मेघना कावली,** मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक जि.प. नांदेड

# अष्टविनायक मंदिर योगसाधना केंद्र व जागृत हनुमान मंदिर योगसाधना केंद्राचे उद्घाटन



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय योग संस्थान (दिल्ली), छत्रपती संभाजीनगर विभागामार्फत मार्च महिन्यात सुरु करण्यात आलेल्या चार केंद्रांपैकी सोमवार, दि. २५ मे रोजी सकाळी ५.३० वाजता श्री अष्टविनायक मंदिर योग साधना केंद्र, अष्टविनायक नगर, भावसार चौक, नांदेड व श्री जागृत हनुमान मंदिर, सरपंच नगर ह्या दोन योग साधना केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून माजी नगरसेवक तथा शिवसेना जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, दीपक सावरकर, शिवाजीराव शिंदे, बालाजी गाजेवार हे उपस्थित होते. भारतीय योग संस्थानचे महाराष्ट्र उपप्रांतप्रधान प्रा. डॉ. उत्तम काळवणे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. ह्या कार्यक्रमासाठी भारतीय योग संस्थानचे पुणे येथील महाराष्ट्र प्रांतमंत्री संजय मराठे ह्यांची विशेष उपस्थिती होती. तसेच ह्या कार्यक्रमासाठी नांदेड समन्वयक सुधाकर ढवळे, जिल्हा प्रधान वैजीनाथ डोमाळे, जिल्हा प्रधान सुरेश डहाके, सुभाषचंद्र सिल्लारकर, नांदेड संपर्कसुत्र विठ्ठलसिंह गहेरवार, सुहास कुळकर्णी, सुरेश शेवाळकर, केंद्रप्रमुख चैतन्यनगर राधा अंभोरे व उपकेंद्रप्रमुख सखाराम पालमकर हे अधिकारीही उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी नगरसेवक तथा शिवसेना जिल्हाप्रमुख उमेश मुंडे यांनी योगासाठी संपूर्ण नांदेड शहरात सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

प्रमुख अतिथी बालाजी गाजेवार ह्यांनी आपल्यातील 'स्व' ला जागवण्यासाठी योगाची आवश्यकता असल्याचे म्हटले.

प्रा.डॉ उत्तम काळवणे यांनी अध्यक्षीय समारोपात शारीरिक, मानसिक, सामाजिक, बौध्दिक व अध्यात्मिक स्वास्थासाठी व चिंतामुक्त व वर्तमानात जगण्यासाठी योग आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच योगवर्गात येऊन साधना करा. त्यामुळे ग्रुप एनर्जी प्राप्त होईल, असे सांगितले.

प्रांतमंत्री संजय मराठे यांनी भारतीय योग संस्थानची माहिती देत, आपल्या व आसपासच्या सर्वांच्या आरोग्यासाठी योगात सातत्य ठेवण्याचे आवाहन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दुर्गा दासे, विश्वनाथ दासे व त्यांची मुले, मनकर्णा मुस्तरे, पल्लवी पांडव, गहेरवाल, सुनीता सावंत, व सर्वच साधकांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन साक्षी पांडव यांनी केले तर आभारप्रदर्शन रवींद्र जोशी व प्रास्ताविक सुरेश डाहाके यांनी केले.

# दाभड येथे २७ मे रोजी सामूहिक मंगल परिणय सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील शांतीदूत प्रतिष्ठानच्या वतीने बुधवार, दि. २७ मे २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता महाविहार बावरीनगर, दाभड नांदेड येथे १७ वा सामूहिक मंगल परिणय सोहळा आयोजित केला आहे. या सोहळ्यात एकूण १५ जोडपे विवाहबद्ध होणार आहेत. हा सोहळा भिक्खू अतुरलिय रतन महाथेरो श्रीलंका, भिक्खू प्रा. डॉ. एम. सत्यपाल महाथेरो, भिक्खू अश्वजीत थेरो, भिक्खू रेवतबोधी, भिक्खू बुद्धभूषण यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

या सोहळ्यास महाउपासक डॉ. एस. पी. गायकवाड, सेनि. अतिरिक्त जिल्हाधिकारी बी. एम. कांबळे, सुरेशदादा गायकवाड, आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम, बी. एम. सुकरे, प्रा. आर. बी. मादळे, सहाय्यक समाजकल्याण आयुक्त शिवानंद मिनगीरे, सेनि. पो उपअधीक्षक विजय डोंगरे, सेनि. पो उपअधीक्षक मारोतराव थोरात, भारतीय बौद्ध महासभा (उत्तर नांदेड) जिल्हाध्यक्ष गणपत गायकवाड, तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांची उपस्थिती राहणार आहे.

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात २७ मेच्या सकाळी ६ वाजेपासून ते १० जून २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २७ मे च्या सकाळी ६ वाजेपासून ते १० जून २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल.

त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

# प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांना छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने दिला जाणारा यंदाचा मानाचा आणि प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार -२०२६' डॉ. शेखर घुंगरवार यांना जाहीर करण्यात आला आहे.



वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांना फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीत शैक्षणिक, सामाजिक, वैचारिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने नुकतेच त्यांना या पुरस्काराचे निवड पत्र प्रदान करण्यात आले. सन्मानपत्र व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि.२६ जून २०२६ रोजी सिडको नवीन नांदेड येथे विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते डॉ. शेखर घुंगरवार यांना प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार -२०२६निवड समितीचे प्रमुख एड. सुजाता पोहरे, डी.एस.वाघमारे, बा.रा.वाघमारे यांनी दिली.

प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव, माजी नगरसेवक ॲड. श्रीनिवास जाधव, प्राचार्य डॉ. विकास कदम तसेच शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट ज्युनियर संघाची आज निवड चाचणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन ऑफ नांदेडच्यावतीने मंगळवार, दि. २६ मे २०२६ रोजी अशोका प्री प्रायमरी स्कूल, कासारखेडा ता. जि. नांदेड येथे सकाळी ९ ते दु. १२ या वेळेत जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट संघ निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. या निवड चाचणीत ज्युनियर गटातील मुले व मुली सहभाग नोंदवू शकतात आणि खेळाडूंचा जन्म दि. ३० जून २००७ नंतरचा असावा.

या निवड चाचणीत निवड झालेले खेळाडू लातूर जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन आणि टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ते ६ जून २०२६ कालावधीत उदगीर जि. लातूर येथे होणाऱ्या २४ व्या राज्यस्तरीय ज्युनियर टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत नांदेड जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करतील.

या निवड चाचणीत सहभाग नोंदविणाऱ्या खेळाडूंनी निवड चाचणीच्या वेळी जन्म दाखला प्रमाणपत्र, आधार कार्ड, शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र आणि दोन पासपोर्ट फोटो सोबत आणावे. या निवड चाचणीत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा, असे अवाहन टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन ऑफ नांदेडचे सचिव कुपटीकर पी. एच. यांनी केले आहे.

# सेवानिवृत्त मुख्याध्यापक पठाण यांचे निधन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषद हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा सामाजिक कार्यकर्ते पठाण मुस्तफा यांचे छत्रपती संभाजी नगर येथे खाजगी रूग्णालयात उपचार चालू असताना दि. २४ मे रोजी सायंकाळी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६६ वर्षांचे होते.



त्यांच्या पार्थिवावर शिवाजीनगर येथील कब्रस्तानमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या अंत्ययात्रेस मोठ्या संख्येने समाजबांधवांची उपस्थिती होती.

# अ.भा. बहुभाषिक ब्राह्मण महासंघाच्या नांदेड जिल्हा शाखेचे सामुहिक राजीनामे

## प्रदेश नेतृत्वावर असमन्वय, दुराव्याचा आक्षेप

**नांदेड (प्रतिनिधी)–** अखिल भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघाच्या नांदेड जिल्हा शाखेच्या कार्यकारिणीने सामुहिक राजीनामा प्रदेशाध्यक्षांकडे सादर केला आहे.

महाराष्ट्र प्रदेश नेतृत्वाने नांदेड जिल्हा शाखेची समन्वय ठेवला नाही व दुर्लक्ष केले असा आक्षेप या पदाधिकाऱ्यांनी घेतला आहे. या सदर्भात संघटनेचे अध्यक्ष बंडोपंत कुंटूरकर यांनी संपूर्ण कार्यकारिणी बरखास्त करून राजीनामा पाठविला आहे. व्हॉट्सअॅपवर पाठविलेल्या याआधीच्या राजीनाम्याबाबत सव्वा महिना कोणतीही दखल न घेतल्याने अखेर २५ मे रोजी लिखित स्वरूपात पुन्हा राजीनामा सादर करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

गेल्या चार वर्षांपासून नांदेड जिल्हा शाखा सक्रियपणे कार्यरत असल्याचा दावा करत कार्यकारिणीने विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांची यादी सादर केली आहे. उपनयन संस्कार, वधू-वर परिचय मेळावा, संत संमेलन, युवक रोजगार मेळावा, गुणवंत विद्यार्थी सत्कार, ज्येष्ठ नागरिक आरोग्य शिबिर, रक्तदान शिबीर आणि वृक्षारोपण यासारखे कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविल्याचे नमूद करण्यात आले आहे. प्रारंभीच्या तीन दिवसीय कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष सुरेशराव मुळे स्वतः उपस्थित होते, मात्र त्यानंतरच्या उपनयन संस्कार कार्यक्रमांना त्यांनी सातत्याने अनुपस्थिती दर्शवल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे.

नांदेड जिल्हा कार्यकारिणीने परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांना नांदेडच्या कार्यक्रमासाठी आणण्याबाबतही प्रदेश नेतृत्वावर नाराजी व्यक्त केली आहे. दामले यांच्या उपस्थितीसाठी वारंवार प्रयत्न करूनही ते कार्यक्रमाला येऊ शकले नसल्याने प्रदेश नेतृत्वाच्या प्रभावक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. एखाद्या चांगल्या नेत्याला नांदेडपर्यंत आणता आले नाही, अशी थेट टीका निवेदनात करण्यात आली आहे.

दरम्यान, नांदेडमधील एका नवख्या कार्यकर्त्याची महाराष्ट्र प्रदेश पातळीवर नियुक्ती करताना जिल्हाध्यक्ष अथवा जिल्हा कार्यकारिणीला विश्वासात न घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे. नियुक्तीबाबत आक्षेप नसून, संघटनात्मक संकेत पाळले गेले नाहीत, हीच मोठी खंत असल्याचे राजीनामा दिलेल्या कार्यकारिणीने स्पष्ट केले आहे.

# किनवट क्रीडा संकुलातील चोरी प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी

**किनवट (प्रतिनिधी)–** तालुका क्रीडासंकुल, किनवट येथे फेब्रुवारी महिन्यात घडलेल्या क्रीडा साहित्य चोरीच्या गंभीर घटनेनंतरही संबंधित यंत्रणेकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नाराजीचा सूर उमटत आहे. याप्रकरणाची तत्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बबन वानखेडे यांनी केली आहे.

येथील क्रीडा संकुल कार्यालयातील बंद खोलीचे कुलूप अज्ञातांनी दि. २ ते ३ फेब्रुवारीच्या रात्री ते ३ फेब्रुवारीच्या पहाटेदरम्यान तोडून मोठ्या प्रमाणात क्रीडा साहित्याची चोरी केली. या चोरीमध्ये टेनिस बॉल, मेडिसिन बॉल, हँड बॉल, क्रिकेट किट, बॅट्स, स्टम्प, कॅरम बोर्ड, बास्केटबॉल आदी साहित्यांचा समावेश असून सुमारे १.५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर दि.३ फेब्रुवारी रोजी किनवट पोलिसांत अधिकृत तक्रार अर्ज दाखल करण्यात आला होता. मात्र, तीन महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही या प्रकरणी कोणतीही ठोस चौकशी किंवा आरोपींचा शोध लागलेला नाही. त्यामुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, दि. २४ मे रोजी याप्रकरणी पुन्हा एकदा निवेदन देत या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तत्काळ चौकशी सुरू करावी, संबंधित दोषींना शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी तसेच चोरी गेलेले साहित्य परत मिळवून द्यावे, अशी मागणी बबन वानखेडे यांच्यासह इतरांनी केली आहे.

# उत्तम वाडीकर यांना शिवछत्रपती राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर

**बाऱ्हाळी (प्रतिनिधी)–** येथील माजी सरपंच तथा पत्रकार उत्तम वाडीकर यांना कोल्हापूर येथील दै. रोखठोकचा राज्यस्तरीय शिवछत्रपती राज्यस्तरीय आदर्श पत्रकार -२६ पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. कोल्हापूर येथे मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



पत्रकार उत्तम वाडीकर यांना कोल्हापूर येथील दै. रोखठोकचा मानाचा शिवछत्रपती राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# इस्लापूरमध्ये गुटख्यासह २७ लाखांचा मुद्देमाल जप्त



**किनवट (प्रतिनिधी)–** इस्लापूर परिसरातील शिवणी येथून हिमायतनगरकडे जाणारा गुटख्याने भरलेला टेम्पो नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेने रविवारी रात्री कोसमेट गावाजवळ पकडला. या कारवाईत पोलिसांनी गुटख्यासह २७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

किनवट तालुक्याच्या शिवणी येथून हिमायतनगरकडे गुटख्याने भरलेला टेम्पो येत असल्याची गुप्त माहिती नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. या माहितीवरून पथकाने कोसमेटमधील एका बारजवळ एम.एच. २६ - सी.एच. ०२६४ या क्रमांकाच्या टेम्पो चालकाला थांबवून पथकाने झाडाझडती घेतली. या टेम्पोमध्ये गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू, जर्दा यासह वेगवेगळ्या कंपनीचा गुटखा आढळून आला. सदरील गुटख्याने भरलेला टेम्पो व टेम्पोतील तिघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेऊन माल व टेम्पो इस्लापूर पोलीस ठाण्यात आणून लावला. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे यांच्या फिर्यादीवरून इस्लापूर पोलिसांनी आरोपी टेम्पोचालक सय्यद महम्मद अली रा. रहीम कॉलनी हिमायतनगर यांच्यासह सय्यद अमीर रा. हिमायतनगर, शेख मजर रा. सुवर्णा तेलंगाणा या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या कारवाईमध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे कर्मचारी दारासिंग राठोड, मोहन हाके, मिलिंद चाटे आबाराव पिंगलवाड यांचा समावेश होता.

# जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये 'एचएलएल' मार्फत मोफत प्रयोगशाळा तपासणी सेवा पूर्ववत सुरू

## नागरिकांनी व गरोदर मातांनी लाभ घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जनतेला आणि विशेषतः गरोदर मातांना उत्तम आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नांदेड पूर्णपणे कटिबद्ध आहे. हिमायतनगर तालुक्यातील सरसम व चिंचोर्डी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत 'महापॅथॉलॉजी लॅब' सेवा बंद झाल्याच्या तक्रारीची जिल्हा आरोग्य प्रशासनाने तत्काळ दखल घेतली आहे. वस्तुस्थिती स्पष्ट करणारी सकारात्मक माहिती नागरिकांसाठी जाहीर करण्यात येत आहे.

शासकीय स्तरावरील काही तांत्रिक व वित्तीय कारणांमुळे तसेच १५ व्या वित्त आयोगाच्या निधी उपलब्धतेअभावी काही काळासाठी मे. एचएलएल लाईफकेअर लि. कंपनीची बाह्यस्त्रोत प्रयोगशाळा सेवा तात्पुरती खंडित झाली होती. या संक्रमण काळात नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर 'In-House' (अंतर्गत) पद्धतीने प्रयोगशाळा तपासण्या करण्याचे निर्देश देण्यात आले होते. परंतु आता वरिष्ठ स्तरावरून हा प्रश्न पूर्णपणे मार्गी लागला आहे.

दि. ३ मे २०२६ पासून जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये मे. एचएलएल लाईफकेअर लि. यांच्यामार्फत राज्यस्तरावरील नवीन करारानुसार प्रयोगशाळा तपासण्यांची सेवा पूर्ण क्षमतेने पूर्ववत सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत नागरिकांना व गरोदर मातांना पूर्वीप्रमाणेच सर्व आवश्यक तपासण्या मोफत उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

**महत्त्वाचे मुद्दे:** १. २५ प्रकारच्या मोफत तपासण्या: नवीन करारानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर एकूण २५ प्रकारच्या अत्यंत महत्त्वाच्या प्रयोगशाळा तपासण्या (उदा. रक्त, लघवी व इतर आवश्यक चाचण्या) मोफत केल्या जात आहेत.

२. गरोदर मातांसाठी अखंडित सुविधा: 'मानव विकास शिबिर' व नियमित आरोग्य तपासणी अंतर्गत येणाऱ्या गरोदर मातांची रक्त व लघवी तपासणी आता पूर्णपणे विनामूल्य व विनाव्यत्यय सुरू करण्यात आली आहे.

३. खाजगी लॅबमध्ये जाण्याची गरज नाही: अधिकृत करारातील २५ प्रकारच्या नियमित चाचण्या प्राथमिक आरोग्य केंद्रातच मोफत उपलब्ध असल्याने, कोणत्याही वैद्यकीय अधिकाऱ्याने बाहेरील खाजगी लॅबसाठी 'स्पेशल टेस्ट प्रिस्क्राईब' (शिफारस) करू नये, अशा कडक सूचना जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत देण्यात आलेल्या आहेत. याचे उल्लंघन झाल्यास संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्राचे देयक अदा केले जाणार नाही व सर्व जबाबदारी संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांची राहील.

तरी हिमायतनगर तालुक्यासह नांदेड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आणि गरोदर मातांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपल्या जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन या मोफत प्रयोगशाळा तपासणी सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. संतोष सूर्यवंशी जिल्हा परिषद, नांदेड यांच्यातर्फे करण्यात येत आहे.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती...

# शिवार

## सोयाबीन पेरताना...

**जमिनीची मशागत (Cultivation) चांगली झालेली असल्यास माती जास्त भुसभुशीत होते. अशा ठिकाणी पेरणी करताना बियाणे (Seed) १० सें.मी.पर्यंत खोल पडण्याची शक्यता असते. अशा प्रकारे बियाणे खोल पडल्यास त्याची उगवण कमी होते. सोयाबीनची पेरणी (Soybean Sowing) करताना बियाणे ३-४ सेंमी पेक्षा खोल पडणार नाही, याची काळजी घ्यावी...**

» वाणाची निवड करताना आपल्या भागासाठी प्रसारित करण्यात आलेल्या वाणाचीच निवड करावी.

» जर पहिल्या पावसावर पेरणी केली आणि त्यानंतर चांगल्या सरी पडल्या नाहीत तर उगवणाऱ्या बियाण्याची मर होते. त्यामुळे मॉन्सूनचा पाऊस १० दिवसांमध्ये ८० ते १०० मि.मी. झाल्यानंतरच पिकाची पेरणी करावी. विशेषतः कोरडवाहू परिस्थितीमध्ये पेरणीसाठी समाधानकारक पाऊस पडल्याशिवाय पेरणीची घाई करू नये.



» स्वतःच्या घरचे किंवा दुसऱ्या शेतकऱ्याकडील सोयाबीन पिकाचे बियाणे अथवा बाजारातून बियाण्याची बॅग विकत घेतली तरी त्यांची उगवणक्षमता चाचणी करावी. बियाण्याची उगवण समाधानकारक असल्याची खात्री पेरणीपूर्वी ८ ते १० दिवस आधी चाचणी करूनच करावी.

» पेरणी करताना बियाण्याची उगवणक्षमता ७० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास प्रति एकरी २६ किलो बियाणे वापरावे. यापेक्षा कमी उगवणक्षमता असल्यास प्रत्येक एक टक्का कमी उगवणीसाठी ४०० ग्रॅम बियाणे अधिक वापरावे. याप्रमाणे ६० टक्के उगवणीसाठी जवळपास ३० किलो बियाणे लागेल. ज्या बियाण्याची उगवण ६० टक्क्यांपेक्षा कमी असल्यास असे बियाणे पेरणीसाठी वापरू नये.

» पेरणी करताना बियाण्यास सर्वप्रथम कीटकनाशक, त्यानंतर बुरशीनाशक व शेवटी जिवाणू संवर्धक या क्रमाने बीजप्रक्रिया करावी. बियाणे बाजारातील असो की स्वतःजवळचे बीजप्रक्रिया केल्याशिवाय सोयाबीन पिकाची पेरणी करू नये.

» सोयाबीनसोबत तूर आंतरपीक घ्यावे. त्याकरिता आपल्या बैलाद्वारे पेरणी करीत असल्यास ४:२ (सोयाबीनच्या ४ ओळीनंतर तुरीच्या २ ओळी) आणि ट्रॅक्टरद्वारे पेरणी करीत असल्यास ६:१, ५:२ किंवा लहान पेरणीयंत्राद्वारे पेरताना ४:१ या सोयाबीन व तुरीच्या ओळींच्या प्रमाणात आंतरपिकाची पेरणी करावी. पावसाचा खंड अथवा जास्त पडणाऱ्या पावसामुळे निर्माण होणारी जोखीम आंतरपीक पद्धतीमुळे कमी होते.

» रुंद वरंबा सरी पद्धतीने पेरणी केल्यास पावसाचा खंड अथवा अति पाऊस या दोन्ही परिस्थितीमध्ये फायदा होतो. त्यामुळे हवामानाचे अंदाज पाहता रुंद वरंबा सरी पद्धतीनेच पेरणी करावी.


» सर्व शेतकऱ्यांनी पुढील वर्षी लागणारे बियाणे आपल्या शेतात चालू हंगामामध्ये तयार करावे. एकदा बाजारातून प्रमाणित किंवा सत्यतादर्शक बियाणे विकत घेतल्यास पुढील तीन वर्षे त्यापासून तयार झालेले बियाणे वापरता येते. सोयाबीनचे बियाणे सरळ वाण प्रकारातील आहेत. (संकरित वाण नव्हेत.) त्यामुळे दरवर्षी बियाणे खरेदी करण्याची आवश्यकता नाही. उगीच नवीन बियाणे खरेदी करून आपला उत्पादन खर्च वाढवू नये.

» सोयाबीन पिकाची पेरणी करताना रासायनिक खताची मात्रा पेरणीसोबतच द्यावी. पेरणीनंतर कोणत्याही खताची मात्रा पिकास देण्याची आवश्यकता नाही. जर पेरणीनंतर नत्रयुक्त खताची मात्रा सोयाबीनला दिली तर पिकाची वाढ जास्त होते. मात्र त्यास फुले व शेंगांची संख्या कमी राहते.

# बियाणे खरेदी करताना...

**पीक उत्पादनामध्ये बियाणांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. विविध बीजोत्पादन कंपन्या शेतकऱ्यांना आकर्षित करणाऱ्या जाहिराती करत असल्यामुळे मुख्यतः बियाण्याच्या दर्जा व त्याच्या गुणधर्मांकडे शेतकऱ्यांचे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. त्यातून शेतकऱ्यांची फसवणूक होऊ शकते. बी- बियाणे खरेदी करताना काय सावधानता बाळगायची याची माहिती घेऊ...**

आपल्या भागातील वातावरण व जमिनीचा विचार करून योग्य त्या पिकाची निवड करावी. आपल्या



भागासाठी शिफारशीत वाणाच्या निवडीला प्राधान्य द्यावा. गेल्या दोन, तीन वर्षांमध्ये आलेल्या रोग आणि किडींचा अंदाज घेऊन, त्यासाठी प्रतिकारक्षम किंवा सहनशील वाण असल्यास त्याची निवड करावी. सिंचनाच्या व्यवस्थेनुसार योग्य त्या वाणाची निवड करावी. कोरडवाहू जमिनीसाठी शिफारस केलेले वाण हे कमी पावसाच्या स्थितीतही चांगल्या प्रकारे वाढू शकतात. आपल्या परिसरातील कृषी विभागातील कृषी अधिकारी, शास्त्रज्ञ यांच्यासोबत चर्चा करून नवीन, सुधारित, संकरित वाणाची माहिती घ्यावी. पूर्वीच्या हंगामात अन्य शेतकऱ्यांनी पेरलेल्या बियाण्याच्या अनुभवाची माहिती करून घ्यावी. पिकाची लागवड व पुढील व्यवस्थापन पद्धती तज्ज्ञांकडून समजावून घ्यावी. उत्तम प्रतीचे खात्रीशीर व नोंदणीकृत बियाणे विक्रेत्याच्या दुकानातूनच खरेदी करावे. शक्यतो कृषी विद्यापीठे किंवा विद्यापीठाचे संशोधन केंद्राकडे बियाण्यांच्या उपलब्धतेसाठी हंगामपूर्व नोंदणी करावी. त्यामुळे सुधारित बियाण्यांचे पेरणीपूर्वी निश्चित उपलब्धता होऊ शकते. बियाण्याची खरेदी करताना कंपनीचे प्रतिनिधी, विक्रेते किंवा जाहिराती यावर अवलंबून बियाणे खरेदी टाळावी.

### बियाण्याचे 4 प्रकार

**बियाण्याचे प्रामुख्याने मूलभूत/पैदासकार बियाणे, पायाभूत बियाणे, प्रमाणित बियाणे व सत्यप्रत बियाणे असे चार प्रकार पडतात.**

१ मूलभूत/पैदासकार बियाण्यांची अनुवांशिक शुद्धता १०० टक्के असते. हे बियाणे त्या पीक पैदासकाराच्या देखरेखीखाली तयार केले जाते. हे बियाणे सामान्य शेतकऱ्यांच्या शेतात लागवडीसाठी उपलब्ध नसते. मूलभूत/पैदासकार बियाण्यासाठी पिवळ्या रंगाची (खूण चिट्ठी) लावलेली असते.

२ पायाभूत प्रकारचे बियाणे तयार करण्यासाठी मूलभूत बियाणे वापरले जाते. पायाभूत बियाण्यांच्या पिशवीवर पांढऱ्या रंगाचा टॅग (खूण चिट्ठी) लावलेला असतो.

३ प्रमाणित बियाणे हे पायाभूत बियाण्यांपासून तयार केले जाते. प्रमाणित बियाणे हे नोंदणीकृत शेतकऱ्यांच्या शेतावर तयार केल्या जाते. याचे उत्पादन प्रमाणीकरण एजन्सीच्या देखरेखीखाली होते आणि प्रमाणीकरण एजन्सीद्वारे मंजूर केले जाते. या बियाण्यास निळ्या रंगाचा टॅग असतो.

४ सत्यप्रत बीजोत्पादनासाठी प्रमाणित बियाण्यांचा वापर करतात. हे बियाणे शेतकरी शेतावर तयार करू शकतात. मात्र या बियाण्यांची अनुवांशिक शुद्धता चांगली असणे गरजेचे आहे. सत्यप्रत बियाण्यासाठी हिरव्या रंगाचा टॅग असतो.




बियाण्याची वैधता तपासणी दिनांकापासून ९ महिने असते, तर नूतनीकरण केलेल्या बियाण्याची वैधता ६ महिन्यांपर्यंत असते. या बाबी पाहूनच बियाणे खरेदी करावे. बियाणे खरेदी करताना बियाण्याच्या बॅगवरील खूण चिट्ठी अगोदर तपासून घ्यावी. त्यावर खालील माहितीची खात्री केल्यानंतरच बियाणे खरेदी करावे. त्यामध्ये प्रामुख्याने पिकाचे नाव, जाती आणि

### बियाण्याची वैधता...

प्रकार, बीज परीक्षणाची तारीख, बियाण्याची उगवणक्षमता, भौतिकशुद्धता, बियाण्याचे चाचणीची तारीख, बियाण्याचा वर्ग इत्यादी काळजीपूर्वक वाचावे. प्रमाणित बियाण्याच्या खूण चिट्ठीवर अधिकाऱ्याची सही असल्याची खात्री करून घ्यावी. याशिवाय बियाण्यास कीड किवा रोग प्रतिबंधक कीटकनाशकाची प्रक्रिया केली असल्यास त्याचा उल्लेख आणि नावे टॅगवर असावीत.

### टॅगवरील सर्व माहिती वाचा

परवानाधारक विक्रेत्याकडूनच बियाण्याची खरेदी करतानाही प्रामुख्याने बीज प्रमाणीकरण यंत्रणेने प्रमाणित केलेले बियाणे खरेदी करण्यास प्राधान्य द्यावे. टॅगवरील सर्व माहिती



वाचून त्याविषयी खात्री झाल्यानंतर शेतकऱ्यांनी विक्रेत्याकडून बियाणे खरेदी करावे. त्यांच्याकडून बियाणे खरेदीचे बिल घावे. या बिलावर बियाण्याचे पीक आणि वाण तसेच गट क्रमांक, बियाण्याचे खरेदीची तारीख लिहिल्याची खात्री करावी. मुदत बाह्य तसेच पॅकिंग फोडलेले बियाणे खरेदी करू नये. भविष्यात जर बियाण्यात काही दोष आढळला तर तक्रार करताना या सर्व गोष्टी उपयोगी पडतात. त्याशिवाय तक्रार ग्राह्य मानली जात नाही. खरेदी केलेले बियाणे वापरण्यापूर्वी पिशवीच्या खालच्या बाजूस छिद्र पाडून बियाणे बाहेर काढावे. बॅगवरील टॅग न काढता, रिकामी पिशवी आणि त्यामध्ये बियाण्याचा थोडासा नमुना शिल्लक ठेवून खरेदी केलेली पावती जपून ठेवावी. पेरणी करताना शक्यतो दोन वेगवेगळ्या लाटचे बियाणे एकत्र करून पेरणी करू नये. जमिनीत योग्य ओलावा असताना पेरणी करावी. पेरणी केलेली तारीख नोंदणी करून ठेवावी. पेरणीनंतर ४ ते ७ दिवसांत बियाण्याची उगवण झालेली दिसून येते.

### उगवण कमी झाल्यास तक्रार करा...



पेरणीनंतर खूण चिट्ठीवरील प्रमाणापेक्षा उगवण कमी झाल्यास अथवा पिकात फार मोठ्या प्रमाणात भेसळ असल्यास बियाणे निरीक्षकाकडे लेखी तक्रार करावी. बियाण्याची उगवणक्षमता कमी असल्यास संबंधित विक्रेता व बियाणे उत्पादक कंपनी यांच्यावर बियाणे कायदा १९६६ मधील कलम १० नुसार कायदेशीर कारवाई होऊ शकते. बियाण्याविषयी काही तक्रार असल्यास जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार द्यावी. कमी दर्जाच्या बियाण्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असल्यास जिल्हा ग्राहक मंचाकडे तक्रार नोंदवून नुकसान भरपाई मागता येते.

# खरीप पिकांसाठी महत्त्वाची सूत्रे



आपली जमीन समस्यांयुक्त (उदा. चुनखडीयुक्त, चोपण, क्षारयुक्त) असल्यास पिकांची पेरणी किंवा लागवड सरी वरंबा किंवा रुंद वरंबा सरी (BBF) वर करावी. म्हणजे उगवण चांगली होते. जास्त पावसात पाण्याचा निचरा व्यवस्थित होऊन वाफसा लवकर येतो. पिकांची पाने पिवळी पडत नाहीत. बियाण्यांची उगवणक्षमता व खतांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी. बियांस प्रथम रासायनिक प्रक्रिया केल्यानंतर २ ते ३ तासांनी जैविक, जिवाणूंची बिजप्रक्रिया करावी. यामुळे बुरशी किंवा किडींपासून संरक्षण होते. बियाणांची उगवणक्षमता वाढते. आपल्याकडील जमिनीत पिकांचे नियोजन करताना पिकांची फेरपालट करावी. यामध्ये एकदल नंतर द्विदलवर्गीय पिकांचा क्रम असावा. या पिकांच्या मुळांची रचनाही पाहावी. म्हणजे जमिनीच्या एकाच थरातील अन्नद्रव्ये घेतली जात नाहीत. द्विदल पिकांच्या मुळांवरील नत्र स्थिरीकरण करणाऱ्या सूक्ष्मजिवाणूंमुळे सुपीकता वाढते. तसेच या पिकाचा पालापाचोळा वाळून वरच्या थरात मिसळला जातो. त्याचे बेवड चांगले होऊन पुढील एकदल पिकाला चांगला फायदा होतो. जमिनीत सेंद्रिय कर्ब व सूक्ष्म जिवाणूंच्या संख्या वाढते. बहुतांशी शेतकरी मकावर-मका, तुरीवर-तूर, सोयाबीनवर-सोयाबीन, उसावर-ऊस, कांद्यावर कांदा अशा प्रकारे पीक पद्धती अवलंबतात. परिणामी रोग व किडींचे चक्र अव्याहत सुरू राहते. प्रादुर्भाव वाढून नियंत्रण खर्चातही वाढ होते. समस्यायुक्त जमिनीची सुपीकता कमी होते. अशा जमिनीमध्ये फेरपालटीत हिरवळीची पिके (धैंचा, ताग) घ्यावी. त्याची वाढ झाल्यावर ४५ दिवसांनी जमिनीत गाडून टाकावा. नंतर पुढील रब्बी हंगामात पिकाचे नियोजन करावे. खरीप हंगामातील पिकांना पेरणीवेळी खताचा बेसल डोस द्यावा. म्हणजे पिकांना बाळसे चांगले येते. बेसलडोसमध्ये शिफारशीत नत्रापैकी अर्धे नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीवेळी द्यावे. उर्वरित नत्र पेरणीनंतर एक महिन्यांनी शक्यतो गाडून द्यावे. जमिनीवर पडलेल्या खतांची कार्यक्षमता कमी होते व ऱ्हास होतो. वाफसा परिस्थितीत पेरणी करताना खते व बियाणे एकाच वेळी यंत्राच्या साहाय्याने किंवा दोन चाडे पाभरीने पेरावे. पेरणीच्या घाईत खत पेरून न दिलेल्या शेतकऱ्यांनी उगवण झाल्यानंतर १५ ते २० दिवसांनी पिकांच्या ओळीपासून १५ ते २० सेंमी बाजूला मोगड्याच्या साहाय्याने खत पेरून मातीआड करावे किंवा खुरपणीपूर्वी जमिनीवर टाकून मातीआड करावे. नारळ, आंबा, चिकू फळबागेमध्येही वयपरत्वे खते वापरली पाहिजेत. पाऊस पडल्यानंतर जून, जुलै महिन्यांत पूर्ण वाढलेल्या फळझाडास ५० किलो शेणखत + २ किलो १५:१५:१५ प्रति झाड द्यावे. दुपारी झाडाची सावली असलेल्या भागात आळे करून खत मातीआड करावे.

### तण देई धन...

फळबागेत तणांचा बंदोबस्त करताना तणे फुले येण्यापूर्वीच पृष्ठभागालगत कटरने कापून जमिनीवर पसरावीत. या हिरव्या पाल्याचा आच्छादनासारखा वापर केल्यास कुजल्यानंतर सेंद्रिय कर्ब व अन्नद्रव्ये जमिनीत मिसळली जातात. म्हणजेच 'तण देई धन'.



### पिकांना पोषणद्रव्ये देताना...

पेरणीनंतर उभ्या पिकात जास्त पाऊस पडल्यास निचऱ्याची व्यवस्था करावी. थोडीशी उघडीप मिळाल्यास सायकल कोळपे दोन ओळींत मारावे. म्हणजे जमीन वाफशावर येईल. तसेच पावसाचा खंड पडल्यास पिके पिवळी पडतात. या दोन्ही परिस्थितीत पिकांना पोषकद्रव्ये फवारणीतून द्यावीत. त्यासाठी फुले द्रवरूप सूक्ष्म ग्रेड II (१०० मिलि प्रति १० लिटर पाणी) या प्रमाणे फवारणी करावी. त्यानंतर ४ ते ५ दिवसांनी १९:१९:१९ हे विद्राव्य खत १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून पिकावर फवारणी करावी. शेणखत नेहमी चांगले कुजलेलेच वापरावे. म्हणजे पेरणीनंतर तणांचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात होत नाही. चांगले कुजलेले शेणखत पेरणीपूर्वी शेवटच्या कुळवाच्या पाळीअगोदर जमिनीत शिफारशीनुसार मिसळावे. शक्यतो तणनाशकांचा कमीत कमी वापर उभ्या पिकात करावा. वापर करण्यापूर्वी तणनाशकांचा प्रकार उगवणपूर्व आहे की उगवणीनंतर करायचा, याची माहिती पॅकिंग व सोबत असलेल्या लेबल वाचून मिळवावी. त्यानुसार योग्य त्या मात्रेचा वापर करून जमिनीवर फवारणी नेहमीप्रमाणे पुढे चालत न करता मागे मागे चालत करावी. म्हणजे फवारलेल्या भागावर आपले पाय पडणार नाहीत.

### मर रोगाचा प्रादुर्भाव

खरीप हंगामात उभ्या पिकांत द्विदलवर्गीय पिकांमध्ये (उदा. सोयाबीन, तूर, मूग, उडीद) मर दिसत असल्यास त्याची कारणे शोधून वेळीच उपाययोजना कराव्यात. १५ दिवसांच्या आत नांग्या भराव्यात. हुमणी / कटवर्म अळी असल्यास क्लोरपायरिफॉसची तेवढ्या जागेत पुढे मागे आळवणी करावी. कोरडी किंवा ओली बुरशी मुळांवर आढळून आल्यास ट्रायकोडर्मा आळवणी वाफशावर असताना मुळाशेजारी करावी. अनुभवानुसार मागील हंगामात मर रोगाचा प्रादुर्भाव द्विदल पिकास जास्त दिसून आला असल्यास प्रथम फेरपालट करावी.

### नवीन फळबाग लागवड

नवीन फळबाग लागवडीचे नियोजन करताना जमिनीमधील प्रातिनिधिक स्वरूपाचा एक खड्डा घ्यावा. त्याच्या वरील बाजूपासून प्रत्येक फुटातील माती खाली मुरूम लागेपर्यंत (जास्तीत जास्त ९० सें.मी.पर्यंत) किमान तीन थरांतील (० ते ३०, ३० ते ६० व ६० ते ९० सें. मी. पर्यंत) वेगवेगळे नमुने घ्यावेत. त्यास पहिला थर, दुसरा थर व तिसरा थर अशी नावे देऊन प्रयोगशाळेतून तपासून घ्यावे. आपली जमीन हलकी असल्यास एक फुटातील एकच नमुना घेऊन तपासणीसाठी पाठवला तरी चालतो. मध्यम खोलीच्या जमिनीत दोन थरांमधील नमुने घ्यावेत, तर खोल काळ्या जमिनीत तीन थरातील वेगवेगळे तीन माती नमुने घ्यावेत. यातून आपली जमीन फळबागेसाठी योग्य आहे का? आणि यात लावलेली बाग किती वर्ष टिकेल, हे समजते. कारण फळझाडांचे उत्पादित आयुष्य हे जमिनीतील मातीच्या खोलीवर अवलंबून असते. सध्या बहुतांश शेतकरी फक्त वरच्या एक फुटातील थराचा नमुना व त्याचा अहवाल, तोही केवळ अनुदान मिळवण्याच्या उद्देशाने घेतात. मात्र एक फुटाखाली चुनखडीचे थर किंवा पाषाण दगडाची तळी असल्यास बागेतील झाडे फक्त दोन ते तीन वर्षे जगतात. नंतर वाळून नष्ट होतात. कारण कोणत्याही जमिनीच्या थरात १० टक्क्यांपेक्षा चुनखडीचे प्रमाण जास्त असल्यास अन्नद्रव्यांची उपलब्धता कमी होते. अशा जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होते. हुमणी, वाळवी, सूत्रकृमींचा प्रादुर्भाव जास्त वाढू शकतो. जमिनीतील काही थरात समस्या असल्यास पोयटा माती भरून फळबागेचे नियोजन करता येते.

### सूक्ष्म अन्नद्रव्येयुक्त खते

५० किलो कुजलेले शेणखतामध्ये २ ते ३ किलो ट्रायकोडर्मा मिसळून जमिनीत ओल असताना टाकावे. भुरक्या चुनखडीयुक्त व चोपण जमिनीत एकरी १० किलो फेरस सल्फेट, ८ किलो झिंक सल्फेट अशी सूक्ष्म अन्नद्रव्येयुक्त खते शेणखतात मिसळून पेरणीपूर्वीच द्यावीत. म्हणजे पेरणीनंतर उगवलेल्या पिकांचा शेंडा पिवळा पडत नाही. पुढे गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळण्यास मदत होते. एकरी ४० किलो कुजलेले शेणखतात ही सूक्ष्म अन्नद्रव्येयुक्त खते मिसळून आठवडाभर मुरवावीत. ती पिकांच्या दोन ओळींत छोटा चर घेऊन मातीआड करावीत. उभ्या पिकांवर फुले द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्ये ग्रेड II ची १०० मिलि प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी एक महिन्यानंतर आठ दिवसांच्या अंतराने दोन वेळा करावी. म्हणजे पाने पिवळी पडणार नाहीत. कांद्याचे रोप तयार करताना वाफे पद्धतीत बी फोकून न करता १.५ मी. रुंद गादीवाफ्यावर १० सेंमी अंतरावर रेघ मारून बी टाकावे. अशा छोट्या छोट्या बाबींचा शेती नियोजनात आवर्जून समावेश करावा. म्हणजे निविष्ठांवरील खर्चात बचत होते. जमिनीची सुपीकता टिकून राहते.

### मशागतीसाठी अवजारांची निवड

खरीप हंगामात भारी काळ्या खोल, चिकण पोताच्या व कमी निचरा असलेल्या जमिनीत वाफसा आल्यानंतर लगेचच इंग्रजी 'एल' आकाराचे पाते असलेले रोटाव्हेटर अनेक शेतकरी मारतात. मात्र त्यामुळे जमिनीमध्ये अर्धा फुटाखाली ठोका बसतो. जमीन तळी धरते. आधीच कमी निचरा असलेल्या जमिनीत पाणी जिरत नाही. व्यवस्थित वाफसा न आल्यामुळे उगवण चांगली होत नाही किंवा एक महिन्यात पिकांची वाढ खुंटते. त्याऐवजी सरळ पाते असलेल्या रोटाव्हेटर किंवा कल्टिव्हेटरचा वापर करून नंतर पेरणी करावी. याउलट हलक्या, मध्यम किंवा पोयटा जमिनीत 'एल' आकाराचे पाते असलेले रोटाव्हेटर मारू शकता.



# पुण्यात आजपासून १४ दिवस जमावबंदी; मोर्चे, आंदोलने, सभांवर कडक निर्बंध

**पुणे (प्रतिनिधी)** – पेट्रोल, डिझेलच्या दरवाढीवरून विविध राजकीय व सामाजिक संघटना आक्रमक होत असताना आता पुणे प्रशासनाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आजपासून पुढील १४ दिवस शहरात जमावबंदीचे आदेश जारी केले आहेत. या काळात शहरात कोणत्याही प्रकारचे मोर्चे, आंदोलने, मिरवणुका व सभा घेण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

पुणे पोलिसांनी सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलिस अधिनियम, १९५१ च्या कलम ३७ (१) (२) (३) अन्वये हे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. आगामी बकरी ईद व इतर सण–उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रात 'अलर्ट'ही जारी करण्यात आला आहे. पाच किंवा त्यापेक्षा जास्त लोकांनी एकत्र येणे, सार्वजनिक ठिकाणी सभा घेणे, मोर्चे किंवा मिरवणुका काढणे यावर पूर्णपणे बंदी असेल. तसेच तलवार, भाला, लाठी, काठी, बंदूक किंवा शारीरिक इजा करू शकणाऱ्या वस्तू सार्वजनिक ठिकाणी बाळगण्यास बंदी असेल. दगड




गोळा करणे, क्षेपणास्त्रे किंवा अस्त्रे तयार करणे, तसेच कोणतेही दाहक, स्फोटक आणि ज्वलनशील द्रव पदार्थ सोबत नेण्यावरही निर्बंध असतील.

यासोबतच सार्वजनिक शांतता भंग करू शकतील अशा अर्वाच्च घोषणा देणे, चिथावणीखोर गाणी किंवा वाद्ये वाजवणे यावर बंदी असेल. तसेच कोणत्याही नेत्याच्या किंवा व्यक्तीच्या चित्राचे/प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यास मनाई आहे. आक्षेपार्ह फलक, शिष्टाचाराच्या विरोधात असणारी चित्रे, चिन्हे, फलक वापरणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल. जर एखाद्या व्यक्तीने या आदेशाचे उल्लंघन करून शस्त्र किंवा धोकादायक वस्तू बाळगल्या, तर पोलीस त्या वस्तू जप्त करतील आणि संबंधित व्यक्तीवर तत्काळ कायदेशीर गुन्हा दाखल केला जाईल.

दुसरीकडे, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्राजित नायर यांनीही विविध विभागांकडून वाहनांचा होत असलेला अवाजवी वापर, अनावश्यक प्रवास व वाढता इंधन खर्च लक्षात घेता सर्व विभागप्रमुखांना इंधन बचतीबाबत तातडीचे आदेश दिले आहेत. महापालिकेच्या वाहनांचा वापर अत्यावश्यक कामांसाठीच करावा, प्रवासाचे योग्य नियोजन करावे, असे त्यांनी म्हटले आहे. मनपाच्या आदेशात म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर देशातील नागरिकांना आवाहन केले आहे. ज्यामध्ये सद्यस्थितीत पेट्रोलियमचे प्रती बॅरल दर वाढलेले असल्याने इंधन वापराबाबत काटकसर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पुणे मनपा अधिकारी/कर्मचारी यांनी या सूचनांचे पालन करावे, असे म्हटले आहे.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंच्याहस्ते पद्म पुरस्कारांचे वितरण

## महाराष्ट्रातील ८ मान्यवरांचा दिल्लीत सन्मान



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – देशातील महत्त्वाचे नागरी सन्मान असलेल्या 'पद्म पुरस्कारांचे' वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नुकतेच सन्मानपूर्वक करण्यात आले. महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले आहे. राष्ट्रपती भवनातील 'गणतंत्र मंडप' येथे आयोजित या समारंभास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच अन्य केंद्रीय मंत्री व मान्यवर उपस्थित होते. सोमवारी पार पडलेल्या पहिल्या टप्प्यातील समारंभात महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यामध्ये ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांना कला क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल मरणोत्तर 'पद्मविभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांच्या पत्नी व खासदार हेमा मालिनी यांनी स्वीकारला.

सहा दशकांहून अधिक काळ हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे धर्मेंद्र यांनी ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. गेल्या नोव्हेंबरमध्ये वयाच्या ८९ व्या वर्षी त्यांचे निधन झाले होते. दोन मान्यवरांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात कोटक महिंद्रा बँकेचे संस्थापक उदय कोटक यांचा समावेश आहे. त्यांनी एका छोट्या बिल डिस्काउंटिंग स्टार्टअपपासून देशातील अग्रगण्य खासगी बँक उभी करून भारतीय बँकिंग क्षेत्रात नवे मानदंड निर्माण केले. कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि आर्थिक धोरण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना गौरविण्यात आले आहे.

जाहिरात क्षेत्रातील सर्जनशीलतेचे प्रतीक मानले जाणारे पीयूष पांडे यांना मरणोत्तर 'पद्मभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या पत्नी नीता जोशी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

पाच मान्यवरांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात जनार्दन बापुराव बोठे यांना सामाजिक कार्यासाठी सन्मानित करण्यात आले. ग्रामीण महाराष्ट्रात जलसंधारण आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' मोहिमेद्वारे अनेक गावांचा पाणीप्रश्न सोडविण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले.

रघुवीर खेडकर यांना कला प्रकारातील तमाशा लोककलेसाठी पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील ज्येष्ठ तमाशा कलावंत कांताबाई सातारकर यांचे पुत्र रघुवीर खेडकर यांनी महाराष्ट्राची पारंपरिक लोककला 'तमाशा' जागतिक स्तरावर पोहोचवली असून लोककलेच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाचे कार्यही त्यांनी केले आहे.

श्रीरंग लाड यांना कृषी क्षेत्रातील कार्यासाठी पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. परभणीचे प्रयोगशील शेतकरी आणि भारतीय किसान संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते लाड यांनी 'दादा लाड तंत्रज्ञान' विकसित करून कापूस उत्पादन वाढीसाठी मोठे कार्य केले. 'लाल कंधारी' गाईंच्या संवर्धनासाठीही त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

नागपूरस्थित उद्योजक सत्यनारायण नुवाल यांनी 'सोलर इंडस्ट्रीज'च्या माध्यमातून संरक्षण क्षेत्र आणि खणिकर्मोद्योगात मोठे योगदान दिले आहे. डिफेन्स एक्सप्लोझिव्ह क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या योगदानासाठी त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मायक्रो इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमी कंडक्टर संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून देशाच्या वैज्ञानिक प्रगतीला चालना देणारे इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रा. जुझर वासी यांना पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

मूळचे पुण्याचे असलेले डॉ. रामचंद्र गोडबोले आणि डॉ. सुनीता गोडबोले या दाम्पत्याला संयुक्तपणे 'पद्मश्री' पुरस्काराने गौरविण्यात आले. गेली ३५ वर्षे त्यांनी महाराष्ट्र आणि छत्तीसगडमधील बस्तर आणि अबू झमाडसारख्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागांत आरोग्य सेवा पोहोचवण्याचे कार्य केले आहे. 'ट्रस्ट फॉर हेल्थ'च्या माध्यमातून त्यांनी आदिवासी भागातील कुपोषण आणि बालमृत्यू कमी करण्यासाठी विशेष योगदान दिले असून, सुमारे एक लाख आदिवासींना मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली आहे. त्यांच्या या योगदानाबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले.

## शिवसेना उपजिल्हाप्रमुख अंबादास मस्के यांच्यावर जीवघेणा हल्ला

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – शहरात शिवसेना उपजिल्हाप्रमुख अंबादास म्हस्के यांच्यावर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. बाबा पेट्रोलपंप चौक परिसरात गळाभेटीच्या बहाण्याने आरोपीने त्यांच्या गळ्यावर चाकूने वार केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी क्रांती चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

रविवारी रात्री उशिरा आरोपी राम बोडखे याने अंबादास म्हस्के यांना फोन करून भेटण्यासाठी बोलावले होते. त्यानंतर बाबा पेट्रोलपंप चौकात भेट झाल्यानंतर मजाक करत होतो असे म्हणत आरोपीने गळाभेट घेत अचानक चाकूने गळ्यावर वार केल्याची तक्रार पोलिसांत देण्यात आली आहे. गंभीर जखमी अवस्थेत म्हस्के यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## कॉमन युनिव्हर्सिटी एन्ट्रन्स टेस्ट २०२६ वेळापत्रकात बदल

**मुंबई (प्रतिनिधी)** – देशभरातील लाखो विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी. कॉमन युनिव्हर्सिटी एन्ट्रन्स टेस्ट परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला असून २८ मे २०२६ रोजी होणाऱ्या दोन्ही शिफ्टमधील परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. बकरी ईद सुट्टीच्या तारखेत झालेल्या बदलामुळे नॅशनल टेस्टिंग एजन्सीने हा निर्णय घेतला आहे. नव्या परीक्षेच्या तारखा आणि प्रवेशपत्रांबाबतची माहिती लवकरच जाहीर केली जाणार आहे.

केंद्रीय विद्यापीठे आणि इतर उच्च शिक्षण संस्थांमधील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी परीक्षा देशातील सर्वात महत्त्वाच्या प्रवेश परीक्षांपैकी एक मानली जाते. यंदा या परीक्षेला लाखो विद्यार्थी बसत असल्याने वेळापत्रकातील या बदलाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. २८ मे रोजीच्या दोन्ही शिफ्टच्या परीक्षा रद्द नाहीत, फक्त पुढे ढकलल्या एनटीएने दिलेल्या माहितीनुसार, २८ मे २०२६ रोजी होणाऱ्या पहिल्या आणि दुसऱ्या शिफ्टमधील परीक्षा सध्या पुढे ढकलण्यात आल्या आहेत. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर कायदा–सुव्यवस्था, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि विद्यार्थ्यांच्या सोयीचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे.

अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की परीक्षा रद्द करण्यात आलेली नसून ती नव्या तारखेला आयोजित केली जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे एनटीएने म्हटले आहे. नवीन परीक्षेचे वेळापत्रक लवकरच जाहीर होणार आहे. २८ मे रोजी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एनटीए स्वतंत्रपणे नवीन वेळापत्रक जाहीर करणार आहे. सुधारित परीक्षेची तारीख, परीक्षा केंद्र, शिफ्ट आणि वेळ यासंबंधीची सर्व माहिती अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध केली जाईल.

यासोबतच संबंधित विद्यार्थ्यांसाठी नवीन प्रवेशपत्रे देखील जारी केली जाणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वेळोवेळी अधिकृत संकेतस्थळाला भेट देत अद्ययावत माहिती तपासत राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# तुकाराम मुंढेंनी स्वीकारला पदभार; २१ वर्षात २५ वी बदली

**मुंबई (प्रतिनिधी)** – कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळखले जाणारे खड तुकाराम मुंढे यांनी आज अन्न आणि औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला. २१ वर्षांच्या प्रशासकीय सेवेतील त्यांची ही २५ वी बदल होती. २००५ मध्ये सोलापूरमध्ये उपजिल्हाधिकारी म्हणून पहिली पोस्टिंग झाली होती. त्यानंतर आतापर्यंत त्यांनी बदल्यांची सिल्हर जुबली पार केली आहे. दीड महिन्यापूर्वीच मार्च महिन्यातच त्यांची आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन व मदत कार्य विभागात बदली झाली होती. पण २ महिन्याच्या आत पुन्हा एकदा त्यांची बदली झाली आहे.



तुकाराम मुंढे कडक प्रशासकीय शैलीमुळे आणि भ्रष्टाचाराविरुद्धच्या कणखर भूमिकेमुळे नेहमीच चर्चेत राहिले आहेत. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये आणि विविध सरकारी विभागांमध्ये काम करताना त्यांनी जनतेच्या हिताला नेहमीच प्राधान्य दिले. त्यामुळे त्यांना नवी ओळख मिळाली. नियमांचे काटेकोर पालन, प्रशासनात पारदर्शकता आणणे आणि बेकायदेशीर कामांना पायबंद घालणे ही त्यांच्या कामाची जमेची बाजू ठरली. राजकीय दबावाला बळी न पडता, सामान्यांच्या हक्कासाठी धाडसी निर्णय घेणारा अधिकारी म्हणूनही त्यांना ओळखले जाते.

आयएएस तुकाराम मुंढे यांनी आज दुपारी अन्न आणि औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला. तुकाराम मुंढे यांची ही तब्बल २५ वी बदली होय. दीड महिन्यांपूर्वीच तुकाराम मुंढे यांची दिव्यांग विभागातून राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन व मदत कार्य विभागात बदली करण्यात आली होती. काही काळापासून अन्न आणि औषध प्रशासन विभाग भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे चर्चेत राहिलाय, त्या ठिकाणी आता तुकाराम मुंढे यांची बदली झाली आहे.

## काश्मीर- गुलमर्ग रोपवे हवेत अडकला; बचावकार्य सुरू

**श्रीनगर (प्रतिनिधी)** – जम्मू–काश्मीरमधील प्रसिद्ध गुलमर्ग रोपवे (गुलमर्ग गोंडोला) मध्ये सोमवारी मोठा तांत्रिक बिघाड झाला. यामुळे रोपवेच्या सर्व केबिन हवेतच थांबल्या. सुमारे ३०० पर्यटक अडकले. अनेक पर्यटक घाबरून रडू लागले आणि खाली उतरवण्यासाठी ओरडू लागले.

प्रत्यक्षदर्शींच्या मते, लहान मुले आणि वृद्धांमध्ये सर्वाधिक भीतीचे वातावरण दिसून आले. घटनेची माहिती मिळताच श्रीनगरहून विशेष बचाव पथके घटनास्थळी पाठवण्यात आली आहेत. सेनाही उपस्थित आहे. सेना, पोलिस आणि प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर बचावकार्य सुरू केले आहे.

### जाहीर प्रगटन

**दिवाणी न्यायालय व स्तर, भोकर ता. भोकर, जि. नांदेड यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १२९/२०२६

अंशाबाई विठ्ठल पंचलवाड व इतर विरूद्ध निरंक

अर्जदार :- १) अंशाबाई विठ्ठल पंचलवाड वय ५३ वर्षे, व्यवसाय - घरकाम, २) शोभा पिरोजी पंचलवाड, वय–२५ वर्षे, व्यवसाय – घरकाम, ३) ओमसाई पिराजी पंचलवार, वय – १० वर्षे, व्यवसाय – शिक्षण, ४) आरूष पिराजी पंचलवाड वय–८ वर्षे, व्यवसाय–शिक्षण.
अर्जदार क्र. ३ व ४ ची अपाक कर्ती अर्जदार क्र.२ सख्खी आई शोभा पिरोजी पंचलवाड सर्व रा. नागापूर ता. भोकर जि. नांदेड
मो.नं. ९६८९३५३१२४

**विरूद्ध**

गैरअर्जदार :- निरंक

**दावा :- कलम ३ मुंबई रेग्युलेशन VIII १८२७ कायद्याप्रमाणे मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ यांचा मुलगा व अर्जदार क्र. २ यांचे पती तसेच अर्जदार क्र. ३ व ४ यांचे वडील मयत नामे पिराजी विठ्ठल पंचलवाड यांचा मृत्यू दि. ०२.०१.२०२६ रोजी झाला असून त्यांच्या मृत्यूपत्राआधारे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्जदार यांनी या न्यायालयात श्री डी.पी. भातलवांडे यांच्या मार्फत अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जदार यांच्या नावे मयतांचे मृत्यूपत्राआधारे वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरिता जर कोणाचा आक्षेप / उजर असल्यास त्यांनी सदर जाहीरात प्रसिद्धीच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आज दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर जि. नांदेड येथे आपण स्वतः, वकिलामार्फत हजर राहून लेखी स्वरूपात आपले म्हणणे, आक्षेप नोंदवावे अन्यथा कोणाचेही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि. ११.०५.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर भोकर**

**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर भोकर**

### Change In Name

My old Name is **SEKH SALIM KHURSHIDMINYA**

Which now I am Changing as

New Name **SHAIKH SALEEM KHURSHIDMINYA**

Henceforth my all correspondence will be done as per my new name.

Please consider the name

Address: **2402, NEAR MUNWAR MASJEED BAGWAN STREETKUNDALWADI TQ BILOLI,NANDED-431711**
**Mob: 9371464928**

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस येते की, आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आपण जाहीर प्रगटनाब्दारे सर्व जनतेस कळविण्यात यावे की, आमचे पक्षकार यांची शेत जमीन मौजे बारड ता. मुदखेड जि. नांदेड येथे असुन या शेत जमीनीचा शेत स.नं. ३६, क्षेत्रफळ ० हे. ५४ आर, आकार २.७५ रु.पै. ही शेत जमीन आमचे पक्षकार भागेरथा दिलीप आलमे यांची वडिलोपार्जीत शेत जमीन असुन या शेत जमीनीवर त्यांचा हक्क व अधिकार आहे. त्यामुळे सर्व जनतेस जाहीर प्रगटणाव्दारे सुचीत करण्यात येते की, आमचे पक्षकार यांना विचारपुस केल्याशिवाय किंवा विश्वासात घेतल्याशिवाय ही शेत जमीन कोणीही खरेदी करु नये असे केल्यास होणाऱ्या परिणामास खरेदी देणार व खरेही घेणार हेच सर्वस्वी जबाबदार राहतील.

करीता जाहीर प्रगटन.

**स्वाक्षरीत/–**
**ॲड. एस.आर. आगलावे**
**मो.नं.९५६१४५४६३२**

### Change In Name

My Old Name is **Yeshwant Mangaji Kamble** which now I am changing as New Name **Yeshwant Mangaji Ratolikar.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Sign By : Yeshwant Mangaji Ratolikar Dist. Nanded**

### Change In Name

My Old Name is **Ramesh Kunjbihari Biyani.** which now I am changing as New Name **Ramesh Kunjabihari Biyani.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - Ramesh Kunjabihari Biyani S/o. Kunjabihari Biyani At.Po. Ward No. 34, Yashoda, Somesh Colony, Behind Kala Mandir, Nanded 431714 Mo.No. 9421776403**

### Change In Name

My Old Name is **Kailas Deliprao Desai** which now I am changing as New Name **Kailash Deliprao Desai.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**- Address -**
**At.Po. Chudawa,**
**Tq. Purna Dist. Parbhani**


कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




### जाहीर प्रगटन

सिटी अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. नांदेड, ता.जि. नांदेड या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणुक सन २०२६–२०३१ या कालावधीचा निवडणुक कार्यक्रम दिनांक २६/०५/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालावधी दिनांक २७/०५/२०२६ ते ०३/०६/२०२६ आहे. प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक ०४/०६/२०२६ रोजी करण्यात येणार असुन वैध नामनिर्देशन पत्राची यादी दि. ०५/०६/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी दिनांक ०५/०६/२०२६ ते १९/०६/२०२६ आहे. निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतीम यादी प्रसिध्दी दिनांक २२/०६/२०२६ करण्यात येणार आहे. आवश्यकता असल्यास मतदान दिनांक २८/०६/२०२६ रोजी संस्थेच्या कार्यालयात घेण्यात येणार असुन मतदान संपल्यानंतर लगेच त्याच ठिकाणी मतमोजणी करुन त्यानुसार निकाल जाहीर करण्यात येणार आहे. संस्थेच्या निवडणुकीचा निवडणुक कार्यक्रम संस्थेच्या, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड व उपनिबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. यांची सर्व सभासद/मतदारांना नोंद घ्यावी.

**(एस.एन. पटके)**
**निवडणुक निर्णय अधिकारी**
**सिटी अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. नांदेड, ता.जि. नांदेड.**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री. प्रदिप व्यंकटराव मुळे रा. चिखली खु. ता. जि. नांदेड मो. नं. ७८७५८३३९३३ यांनी दिनाक ०४.०२.२०२६ रोजी या कार्यालयात त्यांच्या मुलाचे जन्म प्रमाणपत्राचे आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव प्रणव प्रदिप मुळे रा. चिखली खु. ता. जि. नांदेड या सदर व्यक्तीचा त्रिवेणी हॉस्पीटल, बी. के. हॉल समोर, कैलास नगर, नांदेड ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक २८.०७.२०१० या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक ०४.०२.२०२६ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

**तहसिलदार,**
**नांदेड करिता**

### जाहीर प्रगटन

गोदावरी सहकारी पतपेढी मर्यादित गुजराती हायस्कूल नांदेड ता. जि. नांदेड या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणुक सन २०२६–२०३१ या कालावधीचा निवडणूक व दिनाक २५/०५/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येत असुन उमेदवारांनी कालावधी दिनांक २६/०५/२०२६ ते ०२/०६/२०२६ आहे. प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक ०३/०६/२०२६ रोजी करण्यात येणार असुन वैध नामनिर्देशन पत्राची यादी दि.०४/०६/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी दिनांक ०४/०६/२०२६ ते १८/०६/२०२६ आहे. निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतीम यादी प्रसिध्दी दिनांक १९/०६/२०२६ करण्यात येणार आहे. आवश्यकता असल्यास मतदान दिनांक २७/०६/२०२६ रोजी संस्थेच्या कार्यालयात घेण्यात येणार असून मतदान संपल्यानंतर लगेच त्याच ठिकाणी मतमोजणी करुन त्यानुसार निकाल जाहीर करण्यात येणार आहे. संस्थेच्या निवडणुकीचा निवडणुक कार्यक्रम संस्थेच्या, उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड याचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. यांची सर्व सभासद / मतदाराना नोंद घ्यावी.

**निवडणूक निर्णय अधिकारी,**
**गोदावरी सहकारी पतपेढी,**
**मर्यादित गुजराती हायस्कूल नांदेड.**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## पत्नीच्या हत्येप्रकरणी पतीस जन्मठेप व १० हजारांचा दंड

**नांदेड (प्रतिनिधी)**–कौटुंबिक वादातून व दारूच्या नशेत आपल्या पत्नीवर कुऱ्हाडीने हल्ला करून तिचा निघृण खून करणाऱ्या आरोपी पतीस सोमवार दिनांक २५ मे रोजी न्यायालयाने दोषी ठरवून जन्मठेप आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. ज्ञानेश्वर मारोती शिंदे (रा. तिरकसवाडी, ता. मुदखेड) असे जन्मठेपेची शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.



घटनेची पाश्वभुमी अशी की, मृत महिला ताईबाई ही तिचे पती आरोपी ज्ञानेश्वर शिंदे याच्या दारूच्या व्यसनाला व सततच्या मारहाणीला कंटाळली होती. आरोपी ज्ञानेश्वर हा दारू पिऊन तिला सतत शिवीगाळ, मारहाण व दमदाटी करत असे. या त्रासाला कंटाळून त्या काही काळ आपल्या मुलांसह आडगाव (जि. हिंगोली) येथे माहेरी निघून गेल्या होत्या. त्यानंतर नातेवाईक व पंचांसमोर समेट घडवून आणून त्या परत आल्या होत्या. घटनेच्या दिवशी दि. ९ आगस्ट २०२१ रोजी रात्री १०:३० वाजताच्या सुमारास तिरकसवाडी येथील राहत्या घरी आरोपी ज्ञानेश्वर याने पुन्हा घरगुती कारणावरून ताईबाई यांच्याशी वाद घातला. या वादादरम्यान आरोपीने अत्यंत क्रूरपणे ताईबाई यांच्या डोक्यात कुऱ्हाडीने गंभीर घाव घातले. या भीषण हल्ल्यात ताईबाई गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडल्या. त्यांना तात्काळ उपचारासाठी शासकीय रुग्णालय, नांदेड येथे दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

मृत ताईबाई यांचे भाऊ सोनाजी अर्जुन ढगे (वय २७ वर्षे, रा. आडगाव, जि. हिंगोली) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन बारड, ता. मुदखेड येथे गु.रं.नं. ८१/२०२१, भारतीय दंड विधान कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. बारड पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी ज्ञानेश्वर मारोती शिंदे याला अटक केली. प्रत्यक्षदर्शी, वैद्यकीय साक्षीदारांची साक्ष आणि गुन्ह्यात वापरलेली कुऱ्हाड जप्त करून न्यायालयात सबळ दोषारोपपत्र सादर केले.

सदर खटल्याची सुनावणी जिल्हा न्यायाधीश (१) एस. डी. तावशीकर यांच्या न्यायालयात चालली. खटल्यादरम्यान सरकार पक्षातर्फे एकूण १० साक्षीदार तपासण्यात आले. हा खटला सिद्ध करण्यासाठी जिल्हा सरकारी वकील रणजीत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त सरकारी वकील मोहम्मद अब्बास यांनी न्यायालयात सरकार पक्षाची बाजू अत्यंत भक्कमपणे मांडली. पिडीतेवर झालेला हल्ला किती क्रुर होता, हे वैद्यकीय पुरावे आणि फॉरेन्सिक रिपोर्टच्या आधारे त्यांनी कोर्टासमोर सिद्ध केले. सरकारी पक्षातर्फे मांडण्यात आलेला युक्तिवाद, साक्षीदारांच्या साक्षी, पोलिसांनी सादर केलेले परिस्थितीजन्य पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी ज्ञानेश्वर मारोती शिंदे याला पत्नीच्या हत्त्येच्या आरोपाखाली दोषी ठरवले. न्यायालयाने आरोपीला 'जन्मठेप' आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

## किनवट बाजार समितीच्या सभापतींविरुद्ध अविश्वास प्रस्ताव

**किनवट (प्रतिनिधी)** – आर्थिक गैरव्यवहार व कामकाजात अनियमितता या कारणांमुळे किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे यांच्याविरोधात सोमवार दि. २५ मे रोजी उपसभापती राहुल नाईक यांच्यासह १४ संचालकांनी जिल्हा निबंधकांकडे अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे.

किनवट बाजार समितीचा कारभार गेल्या अनेक दिवसांपासून ढेपाळला आहे. बाजार समितीच्या शेतजमीन विक्रीतून बँकेत ठेवलेली जवळपास दीड कोटी रुपयांची रक्कम सभापती गजानन मुंडे व सचिव राजू राठोड यांनी परस्पर उचल केल्याची तक्रार उपसभापतींसह १४ संचालकांनी २० दिवसांपूर्वी सहायक निबंधकांसह सर्व संबंधितांकडे केली होती. या प्रकरणाची चौकशी अद्याप गुलदस्त्यातच आहे. बाजार समितीचे सचिव महिनाभरापासून बाजार समितीत हजर नाहीत, या प्रकाराकडे वरिष्ठांचे लक्ष नाही. एकूणच बाजार समितीच्या ढेपाळलेल्या कारभाराला वैतागलेल्या संचालकांनी सोमवारी जिल्हा निबंधकांची भेट घेवून सभापती मुंडे यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव सादर केला. सन २०२५ – २६ मध्ये बाजार समितीमार्फत खरेदी केलेल्या सोयाबीनचे पैसे शेतकऱ्यांना न देणे, वारंवार लेखी व तोंडी सूचना करूनही गेल्या १० महिन्यांपासून मासिक सभा न घेणे, बाजार समितीची



सर्व कागदपत्रे सचिवाच्या ताब्यात ठेवणे अशा गैरकारभाराला कंटाळून संचालकांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियम) अधिनियम १९६३ च्या कलम २३ (१) अन्वये हा अविश्वास प्रस्ताव दाखल करत या प्रस्तावावर ७ दिवसाच्या आत विशेष सभा घेण्याची मागणी केली आहे. प्रस्तावावर उपसभापती राहुल नाईक यांच्यासह संचालक सोपानराव केंद्रे, अनिल पाटील कऱ्हाळे, श्रीराम कांदे, सुनील घुगे, प्रल्हाद सातव, प्रेमसिंग साबळे, प्रेमसिंग जाधव, बालाजी बामणे, शेख हैदर, राजू सुरोशे, कैलास बिज्जमवार, अ. सत्तार, विद्या दासरवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## घातक शस्त्रांसह तिघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्नेहनगर रोड परिसरात विनापरवाना ४०० रुपये किमतीचा लोखंडी खंजर बाळगल्याप्रकरणी एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले. पोकॉ. विष्णूकांत मुंडे यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

दुसऱ्या कारवाईत कल्याणनगर कॅनाल रोडवर ५०० रुपये किमतीचा लोखंडी खंजर बाळगून फिरणाऱ्या सुरेश शंकरराव जमदाडे (वय ३१, रा. वाडी बु.) याला अटक करण्यात आली. पोकॉ. नागनाथ चापके यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला. टायर बोर्ड परिसरात ५०० रुपये किमतीचा लोखंडी खंजर बेकायदेशीरपणे बाळगल्याप्रकरणी शेख हसन शेख वाहब (वय २४, रा. टायर बोर्ड) या तरुणाला अटक करण्यात आली. पोकॉ. मारोती पंचलिंग यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तिसऱ्या कारवाईत हिंगोली गेट येथील फटाका मैदानावर ३०० रुपयांचा खंजर बाळगल्याप्रकरणी साईनाथ सुनील धोंगडे (वय २१, रा. सोमेश कॉलनी) याला ताब्यात घेण्यात आले.

## आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण

**नांदेड (प्रतिनिधी)** – भारतीय जैन संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींना मोफत शिक्षण देण्यात येणार आहे. त्यासाठी संपर्क साधण्याचे आवाहन संस्थापक अध्यक्ष शांतीलाल मुथा यांनी केले आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना पुणे येथील वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पामध्ये प्रवेश देऊन त्यांचे शिक्षण, निवास, भोजन, गणवेश, शैक्षणिक साहित्य तसेच इतर आवश्यक सुविधा विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मागील दोन वर्षात आत्महत्या झालेल्या शेतकरी कुटुंबातील इयत्ता पाचवी, सहावी व सातवी मध्ये आता प्रवेश घेत असलेल्या मुला-मुलींना या प्रकल्पात प्रवेश देण्यात येणार आहे. त्यांचे बारावी पर्यंतचे संपूर्ण शिक्षण भारतीय जैन संघटनेमार्फत विनामूल्य करण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांकडून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पात्र विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त करण्यात आली आहे. भारतीय जैन संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना या योजनेची सविस्तर माहिती व्हिडिओ व छायाचित्रांच्या माध्यमातून समजावून सांगणार आहेत.

### मुलांचे शिक्षण थांबू नये यासाठी प्रयत्न –हर्षद शहा व राजीव जैन

शेतकरी कुटुंबातील कर्त्या पुरूषाच्या आत्महत्येनंतर संपूर्ण कुटुंब मानसिक, सामाजिक व आर्थिक संकटात सापडते. अशा कठीण परिस्थितीतही मुला–मुलींचे शिक्षण थांबता कामा नये, त्यांनी शिक्षण घेऊन भविष्यात स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे उचलली पाहिजे, हा उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे भारतीय जैन संघटनेचे राज्य कार्यकारणी सदस्य हर्षद शहा व राजीव जैन यांनी सांगितले. नांदेड जिल्ह्यातील गरजू कुटुंबांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी हर्षद शहा (९४२२१ ७१२४५) किंवा राजीव जैन (९८९०९ ६६०६२) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com